**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०१/ २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०६ / ०६ /२०१६.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०१, मंगळवार दिनांक १४ / ०६ /२०१६.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक १४ /०६/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी
३. मागील सभा क्र.४ दिनांक १६/०३/२०१६, सभा क्र. ५ दिनांक ११/०३/२०१६ व सभा क्र. ६ दिनांक २९/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - १

मंगळवार दिनांक १४ / ०६ / २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका सभागृह,

नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे होणा-या सर्वसाधारण सभेची

**विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ०१ | मागील सभा क्रमांक ४ दिनांक १६/०३/२०१६, सभा क्रमांक ५ दिनांक ११/०३/२०१६ व सभा क्रमांक ६ दिनांक २९/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| ०२ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ०३ | श्री.पाटीलबा रावजी खेमनर, इलेक्ट्रीक लिपीक यांनी सादर केलेले वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणेबाबत निर्णयाकरीता प्रस्ताव. |
| ०४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (सर्वांसाठी घरे) राबविणे बाबत मा.शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्र.आयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल) दिनांक ९ डिसेंबर २०१५ व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ०५ | महानगरपालिका कायद्यातील तरतुदींनुसार प्रभाग क्रमांक ३२ चे नगरसेवक मा.श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे नगरसेवक पदा बाबत... |
| ०६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०६ / ०६ /२०१६.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०१** **दिनांक : १४ / ०६ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मागील सभा क्रमांक ४ दिनांक १६/०३/२०१६, सभा क्रमांक ५ दिनांक ११/०३/२०१६ व सभा क्रमांक ६ दिनांक २९/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-** मागील सभा क्रमांक ४ दिनांक १६/०३/२०१६, सभा क्रमांक ५ दिनांक ११/०३/२०१६ व सभा क्रमांक ६ दिनांक २९/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

चर्चा :-

मा.महापौर साहेब :- कोरम अभावी १० मिनिटे सभा तहकूब करण्यांत येत आहे.

कोरम नाही परंतु तहकुब सभा आहे. गणपूर्ती नसली तरी कामकाज निकाली काढण्याची तरतुद आहे ती वाचन केली. मा.महापौर अधिनियमातील तरतुदी नुसार सभा चालू करावी.

मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे विषयाचे वाचन केले.

सभागृह नेता मा.श्री.कुमार वाकळे यांनी सभागृहात पत्र दिले.

मा.महापौर साहेब :- सभागृह नेता मा.श्री.कुमार वाकळे यांनी दिलेल्या पत्रानुसार दिनांक २९-३-२०१६ रोजी मा.महासभा विषय क्र. ६० मुद्दा क्र. १३ आणि मा.महासभा विषय क्र. ५८ दिनांक ११-३-२०१६ मधील इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करण्यात यावे. यास ही सभा मान्यता देत आहे.

नगरसचिव :- मा.महापौर साहेब यांचे संमतीने मा.आयुक्त साहेब यांचा सत्कार करावा अशी विनंती.

मा.श्री.दिप चव्हाण :- बजेटच्या मिटींगचे दिवशी मी एक पत्र दिले त्याचे उत्तर नगरसचिव यांनी दिलेले नाही. बजेट हा फुगवटादार आहे. आयुक्त साहेबांनी सुध्दा मान्य केले. गव्हर्नमेंट ऑडीटर आल्या होत्या त्यांनीही हे सांगीतले आहे.

नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- पत्राची नोंद घेण्यात आली आहे. बजेट तयार करण्याचे काम अकौंट विभागाचे आहे. उत्तर दिलेले नाही हे खरे आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- उत्तर देत नाही सभागृहाचे संकेत आहे. सदस्यांच्या पत्रांना उत्तर देणे बंधनकारक आहे. विकासभाराची तरतुद संपूर्ण निधी संपलेला आहे. आज बजेटला मंजूर करुन घेता मंजूरी मिळाल्यानंतर बजेट लागू करतो.

मा.महापौर साहेब :- बजेटच्या महासभेत उशीराने प्रोसेससाठी वेळ लागला उशीर झाल्यामुळे तरतुदीपूर्ण झाल्या ते महापौर किंवा सदस्यांच्या सांगण्यानुसार कामे खतविले जातात.

मा.श्री.दिप चव्हाण :- कन्फरमेशन नंतर बजेट खाली येते त्याच्या अगोदर निधी सर्व संपला आहे. असे इथून पुढे हे घेडु नये.

मा.महापौर साहेब :- एकदा बजेट मंजुरी झाल्यानंतर आयुक्तांचे मंजुरीनंतर बजेटची कार्यवाही केली जाते सन २०१७-२०१८ च्या वेळेस बदल करु.

नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- अंदाजपत्रकीय सभा झालेल्या इतिवृत्ताचे शेवटचे परिच्छेदात बजेटच्या मंजूरीची वाट न पहाता कार्यवाही करावी अशी नोंद आहे.

मा.श्री.किशोर डागवाले :- या सभागृहामध्ये प्रथम नविन आयुक्तांचे अभिनंदन करतो. या शहरामध्ये रुजू झाल्यानंतर तातडीने त्यांनी सर्व खाते प्रमुखांची मिटींग घेवून धडाक्याने सुरुवात केली इतिवृत्त कायम करत असतांना वाकळे साहेब, बारस्कर साहेब यांनी सुचित केले प्रमाणे जो निधी राखुन ठेवतो त्या कामाचे देयक निघत नसल्यामुळे कामे कोणी करीत नाही. म्हणुन मागच्या वेळेसही सांगण्यात आले होते. स्वतंत्र खाते उघडावे जेणेकरुन तातडीने कामे मार्गी लागतील स्वतंत्र खाते केले का ? त्यावर रक्कम वर्ग केली का ?

मा.महापौर साहेब :- संबंधितांनी खुलासा करावा.

मा.उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :- मा.श्री.डागवाले साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. त्यामध्ये १) नगरसेवक स्वेच्छा निधी २) महिला व बालकल्याण समिती सभापती निधी ३) स्थायी समिती सभापती स्वेच्छा निधी ४) महापौर स्वेच्छा निधीचे मागणी प्रमाणे स्वतंत्र वेगळे खाते काढले आहे. आर्थिक नियोजन कसे करावयाचे तेही ठरले आहे. नविन मुख्यलेखाधिकारी हजर झाल्यानंतर याबाबत कार्यवाही करण्यांत येईल. स्थानिक संस्था कराच्या माध्यमातुन रक्कमा यावर्षी ट्रान्सफर केल्या जातील साधारण सहा कोटींचे नियोजन केले आहे. स्थानिक संस्था कराच्या माध्यमातुन १२ महिन्याला ६० ते ७० लाख रुपयांचा निधी वर्ग करण्याचे नियोजन केले आहे. पैसे बाजुला ठेवण्यात येत आहेत. मुख्य लेखाधिकारी हजर झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. यापुर्वीचे देणीसाठी या निधीचा वापर करता येणार नाही. सन २०१६-२०१७ च्या मधील कामांसाठी हा निधी वापरला जाईल.

मा.आमदार श्री.संग्राम जगताप :- नगरसेवक स्वेच्छा निधी हा सर्व नगरसेवकांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. नगरसेवक स्वेच्छा निधीची अंदाजपत्रकात तरतुद केली जाते. परंतु या निधीतील देयकास विलंब होत असल्याने कोणीही ठेकेदार ही कामे करण्यास तयार होत नाही. ब-याच नगरसेवकांचा निधी पडून राहतो. उपायुक्तांनी जो खुलासा केला त्याची अंमलबजावणी आज पासुन सुरु करा. ईमरजन्सी कामासाठी तातडीने प्रस्ताव सादर करुन मंजू-या घ्याव्या लागतात. नगरसेवकांचा प्रस्ताव आला की लगेच मंजूरी द्या व बील निघेल अशा प्रकारे अंमलबजावणी करा.

मा.महापौर साहेब :- सदस्यांनी जी चर्चा प्रस्तावित केली त्यानुसार कॅफो येईपर्यंत पैसे अकौंट मध्ये जमा करावेत.

उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :- चार विभाग जे सांगीतले त्यासाठीचे आर्थिक नियोजन आम्ही करणार आहोत. या आर्थिक वर्षात तुम्ही कामे करा. त्याचे देयक देण्याची जबाबदारी महानगरपालिका घेत आहे. संबंधितांना आपण तसे आश्वस्त करावे.

मा.श्री.अनिल शिंदे :- आमदार साहेबांनी जो नगरसेवक निधीचा मुद्दा उपस्थित केला ८ लाखांचा निधी असुन किती टक्के निधी खर्च करण्यास आयुक्त साहेब मंजूरी देतील याचा खुलासा आयुक्त साहेबांनी करावा.

मा.महापौर साहेब :- नगरसेवक निधी १०० टक्के खर्च करण्यात यावा असे कार्यालयीन आदेश आहेत.

मा.आयुक्त साहेब :- सदस्य स्वेच्छा निधीला खर्चाचे बंधन नाही आर्थिक वर्षात तो खर्च करता येवू शकेल. इतर निधी संदर्भात एक कार्यालयीन आदेश काढणेत आलेला आहे त्यानुसार अंमल केला जाईल. त्या आदेशाचे वाचन केले.

मा.श्री.अनिल शिंदे :- आत्ता ज्या आदेशाचे वाचन केले तो आदेश तंतोतंत खाते प्रमुखाला पाळायला सांगा.

मा.श्री.किशोर डागवाले :- ५० टक्केच्या पुढे कामे झाली असतील तर ती रद्द करा.

मा.श्री.कैलास गिरवले :- सन्माननीय माजी नगराध्यक्ष श्री.शंकरराव घुले यांचे दु:खद निधन झाले तत्कालीन नगरपालिका असतांना नगराध्यक्ष म्हणुन त्यांनी उल्लेखनीय कामे केली. कष्टकरी हमाल पंचायतीमध्ये त्यांनी काम केले. नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-यां साठी स्व.सदाशिव अमरापुरकर पुरस्कार आपण देणार आहोत. कै.शंकरराव घुले यांचे क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान होते. कुस्ती क्षेत्रात त्यांचा नाव लौकीक होता. तरी कुस्ती क्षेत्रातील उल्लेखनिय कामगीरी साठी त्यांचे नावाने क्रीडा पुरस्कार देण्यात

यावा व अंदाजपत्रकात तशी तरतुद करण्यांत यावी. मा आयुक्त साहेबांनी टेंडर दरा पेक्षा जादा दराने आलेल्या निविदा रद्द करुन अंदाजपत्रकीय दराने करणे बाबत निर्णय घेतल्याचे आम्हाला समजले. आपण इस्टीमेट दराने मंजुरी दिली.पालिकेचे हित डोळयासमोर ठेवुन जर निर्णय घेतला असेल तर आपले त्याबद्‌ल आभार व धन्यवाद.

मा.महापौरः-सन्माननीय सदस्यांनी ज्या सुचना मांडल्या कै.शंकरराव घुले यांचे नावे संबधीतास क्रिडा पुरस्कार देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे,सभागृहनेता- मी माझ्या प्रभागात आरोग्य विभागासाठी कर्मचारी मागीतले मला अदयाप ते मिळाले नाही याबाबत खुलासा करावा .

मा.महापौर-संबधीतानी खुलासा करावा.

डॉ.पैठणकर,उपआरोग्यअधिकारी- मा.वाकळे साहेब यांच्या वॉर्डात कर्मचा-यांचे बाबतीत आदेश काढला होता परंतु त्यापैकी काही कर्मचारी हजर झाले नाहीत. जे कर्मचारी हजर झाले नाहीत त्यांचा प्रस्ताव आस्थापना विभागाकडे दिला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- एक कर्मचारी दिला तोही लंगडा आहे. सत्तेत असून कर्मचारी मिळत नाही अडीच महिन्यानंतर कर्मचारी मिळाले.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- आयुक्त उपायुक्त यांनी नगरसेवकांचे मागणी बाबत काहीही कार्यवाही केली नाही.

डॉ.पैठणकर :- जे हजर झाले नाहीत त्यांनी ताबडतोब हजर होणे बाबत प्रस्ताव सादर करतो.

मा.श्री.कुमार वाकळे :- फेज-२ चे माझे प्रभागातील कार्यवाही बाबत माहिती देण्यात यावी.

मा.महापौर साहेब :- प्रत्येक प्रभागात किती सफाई कर्मचारी आहेत याची साबळे यांनी माहिती द्यावी. एखादा कर्मचारी रिटायर्ड झाला. रजेवर गेला त्या जागी कर्मचारी मिळत नाही.

श्री.साबळे :- कर्मचारी रजेवर गेला तर विभाग प्रमुखानेच त्या जागी व्यवस्था करावयाची असते. महानगरपालिकेत अतिरिक्त कर्मचारी असल्याने नव्याने भरती केलेली नाही.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- नागरीक आमच्याकडे तक्रार करतात आम्ही त्यांना काय उत्तर द्यायचे.

मा.श्री.कैलास गिरवले :- ज्या प्रभागात कर्मचा-याची नेमणूक केलेली आहे. त्या प्रभागात ते कामच करीत नाहीत. कागदोपत्री संख्या दिसते. याचा सर्व्हे करा. अन्य कर्मचारी असे आहेत सह्या करुन जातात व पगार घेतात. अधिका-यांना हप्ते देतात. अनेक लोकांच्या घरी धुन्या भांडयाची कामे करतात.

मा.आयुक्त साहेब :- जे काही उपलब्ध कर्मचारी नाहित. त्यांचा फेर आढावा घेवून भौगोलिक क्षेत्रानुसार उपलब्ध कर्म्रचा-यांचे न्याय वाटप करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

मा.आ.श्री.संग्राम जगताप :- कर्मचारी ठेकेदार म्हणुन काम करतात. अधिका-यांच्या दालनात येवून बसतात. स्वाक्ष-या घेतात. मागील सभेत चौक सुशोभिकरण करणेबाबत ठराव करणेत आला त्याबाबत कुठलिही अंमलबजावणी केली जात नाही. रस्त्याने कच-याचे ढिगारे आहेत. उशीराने नाले सफाई आत्ताच सुरु केली आहे. दिनांक ३१ मार्च २०१६ पुर्वी नियोजन करायला पाहिजे होते. इतर महानगरपालिकांचे काम यापुर्वीच सुरुझाले आहे. स्वच्छते बाबत कोणत्या भागात मा.आयुक्त, उपायुक्त फिरले याचा खुलासा करावा. अधिकारी फक्त केबीनमध्येच भेटतात.

मा.श्री.सुनिल कोतकर :- माझ्या प्रभागात कचरा कुंडया फुल झाल्या आहेत. दिड महिना झाले गाडया बंद आहेत. ट्रक्टरची व्यवस्था करायला पाहिजे. स्वच्छता निरीक्षक श्री.रामदिन यांना सांगीतले असता रिपोर्ट ठेवला आहे, एवढेच उत्तर मिळते.

श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :- केडगांवची जी वाहने बंद आहेत. ती वस्तुस्थिती आहे. गेल्या एक महिन्यापासुन कार्यरत क्लार्क सेवानिवृत्त झाल्याने त्या जागी कर्मचारी उपस्थित नव्हता. तसेच रिक्युपमेंट शिल्लक नसल्याने काम झाले नाही. आल वाहनाचे काम होवून जाईल. चार दिवसापुर्वी कर्मचारी नेमण्यात आला आहे. घनकचरा विभागाने पर्यायी वाहन उपलब्ध करुन द्यायला पाहिजे.

मा.श्री.गणेश भोसले :- इलेक्ट्रीक विभागाची हायड्रोलिक गाडी एक ते दिड महिन्यापासुन बंद आहे. सातपुते साहेब सिव्हील इंजिनियर आहेत त्यांना इलेक्ट्रीक विभागाचे काम दिले आहे. त्यांना इतर विभागात पाठवा.

श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :- इलेक्ट्रीक गाडीची पुर्ण सिस्टीम खराब झाली आहे. नगरमध्ये दुरुस्ती होवू शकत नाही. कंपनीशी संपर्क करुन आता काम सुरु झाले आहे.

मा.श्री.कैलास गिरवले :- प्रत्येक झोन वाईज इलेक्ट्रीक गाडी घ्या. निधी आपण इतरत्र वापरतो.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- आमच्याकडे डंपर प्लेसर, जेसीबी., मशिनरी, पोकलँड आहेत दुरुस्तीची आम्हाला माहिती आहे. निधी अभावी गाडी रिपेअर होवू शकत नाही. हे सांगा ते आम्ही मान्य करु.

मा.श्रीमती.नसीम शेख :- मुकुंदनगर भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होतो. मुकुंदनगर भागासाठी पाणीपुरवठयाच्या मोटारी जुन्या झाल्या आहेत. १० एच.पी.च्या नविन मोटारी देणे बाबत पत्र दिले आहे.

श्री.निकम, मेकॅनिकल इंजिनियर :- मध्यंतरीच्या काळात मुळानगर व विळद पंपिंग स्टेशन येथे वारंवार खंडीत विजपुरवठयामुळे कमी दाबाने पाणी पुरवठा संपुर्ण शहरास होत होता. मोटारी बदलण्याची आवश्यकता नाही. मोटारी बाबत तपासुन कार्यवाही केली जाईल.

श्री.पैठणकर घनकचरा व्यवस्थापन प्रमुख :- जे कर्मचारी उपस्थित नाहीत त्यांचेबाबत प्रस्ताव ठेवण्यांत येईल.

मा.श्री.किशोर डागवाले :- वाकळे साहेबांनी जो मुद्दा मांडला त्याचे उत्तर कुठल्याही अधिका-याला देता आले नाही. पैठणकर साहेब हजर कसे झाले. ते जर दोषी असतील तर काय कार्यवाही केली. जर दोषी नसतील तर तसे सांगा. डिझेल चोरी प्रकरणात पैठणकर निलंबित होते. ते जर दोषी असतील तर त्यांचेवर काय कार्यवाही झाली.

डॉ.पैठणकर, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख :- वाकळे साहेबांच्या प्रभागात बदली झालेले कर्मचारी इतर विभागात कार्यरत आहेत. जेव्हा ते कर्मचारी घनकचरा विभागात हजर होतील तेंव्हा ते वाकळे साहेबांकडे पाठविण्यात येतील.

मा.श्री.कुमार वाकळे :- आस्थापना विभागाने या कर्मचा-यांच्या बाबतीत काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

मा.श्री.दिप चव्हाण :- सभागृह नेते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उपप्रश्न निर्माण झाले आहेत.

मा.महापौर साहेब :- मा.आयुक्त साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार कर्मचा-यांचा फेर आढावा घेवून प्रत्येक प्रभागात सारखे कर्मचारी मिळतील याबाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.दिप चव्हाण :- कर्मचा-याची खरी माहिती द्यायला प्रशासन कचरते. कर्मचारी कार्यात कुठे आहेत हे सांगायला तयार नाहीत त्याची चौकशी लावण्यात यावी.

श्री.साबळे :- सभागृहाला विनंती तीन दिवसात १४ कर्मचारी हजर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

मा.श्री.कुमार वाकळे :- आरोग्य विभागातील एक कर्मचारी नगरसेवकांबरोबर सहलीला गेलेला आहे. त्याच्यावर कार्यवाही करा.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- आयुक्त साहेब तुम्ही संबंधित अधिका-यांवर कारवाई करा.

मा.श्री.कैलास गिरवले :- सोनवणे नावाचा कर्मचारी महिन्याची रजा टाकली का.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- कर्मचा-याचे फोन येतात बदली करुनका.

श्री.साबळे :- कर्मचा-यांची यादी वाचून दाखवली.

मा.श्रीमती.नसीम शेख :- नगर शहराची परिस्थिती खराब आहे. प्रभाग अधिकारी यांना बोलावुन कर्मचारी कुठे-कुठे आहेत. कर्मचा-याच्या जागेवर पैसे घेवून, दुसरे कर्मचारी काम करतात वायाळ हे हजर झाल्यानंतर मुकुंदनगर भागात आले नाहीत. ते फिरत नाहीत.

मा.श्री.आरीफ शेख :- वायाळ संदर्भात मी दोन वेळा आपणाशी चर्चा केली. मी आपणाबरोबर २ वेळा चर्चा केली तो शिपायाच्या लायकीचा आहे. त्याची इतरत्र बदली करा.

श्री.साबळे :- संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यात येईल.

मा.श्री.कुमार वाकळे पाटील :- अडीच महिने झाले काही कारवाई केली नाही. साबळे यांच्यावरच कारवाई प्रस्तावित करा.

श्री.साबळे :- दि.१८/०६/२०१६ ला घनकचरा विभागाने प्रस्ताव दिला. दि.०५/०४/२०१६ ला बदली केली. घनकचरा विभागात हजर होणे बाबत आदेश निर्गमित केले. पैठणकर साहेबांनी हजर न झालेल्या कर्मचा-यांचा प्रस्ताव आस्थापना विभागाकडे दिलेला नाही.

मा.आयुक्त साहेब :- कचरा या विषयावर आपण काही उपाय योजित आहोत. पूर्ण सफाई कर्मचा-यांचा फेर आढावा घेवुन कार्यवाही करण्यात येईल. कचरा वाहतुक गाडयांच्या बाबतीत निकम यांनी तातडीने उपाय योजना करावी. आमदार महोदय म्हणाले सफाई कर्मचारी सफाई करतांना दिसत नाहीत. मी हजर झाल्यानंतर दर गुरुवारी ७ ते ९ दरम्यान स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (कर) यांनीही अभियानात सहभाग घेतला. प्रातिनिधीक स्वरुपात उपाय योजित आहोत. मा.स्थायी समिती सभापतींनी मांडलेला कॉम्पॅक्टर खरेदीचा विषय मार्गी लावला. कचराकुंडया घेण्या संदर्भात १४ व्या वित्त आयोगामधुन २० कुंडया व मनपा निधीतुन ५० कुंडया अशा ७० कुंडया घेण्यात येत आहेत. निकम यांनी त्यास गती द्यावी अशी माझी सूचना आहे. कचरा उचलण्या संदर्भात दोन वेळा निविदा प्रसिध्द केल्या आहेत. प्रभाग अधिकारी श्री.वायाळ यांच्या बाबतीत उपायुक्त (सामान्य) यांचेशी चर्चा केली आहे. त्याबाबत उचित निर्णय घेण्याचा प्रयत्न करु सफाई कर्मचारी फिरतात. बेशिस्तीची दखल घेवून उपायुक्त (सा) यांनी कार्यवाही करावी.

उपायुक्त (सा) :- महानगरपालिकेचे सभागृह नेते यांनी जो प्रश्न सातत्याने उपस्थित केला. बदली झालेले काही कर्मचारी त्यांचे प्रभागात हजर झालेले नाहीत. सफाई कर्मचा-यांची नियुक्ती स्थानिक परिस्थिती विचारात घेवून केली जाते. या बदली आदेशातील काही कर्मचारी केडगांव किंवा दवाखाने इत्यादी ठिकाणचे आहेत. कर्मचारी गैरहजर आहेत असा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अहवाल प्राप्त असो किंवा नसो तीन दिवसात कर्मचारी हजर करण्याची कार्यवाही करण्यांत येईल. १२ मधील दोन कर्मचारी हजर झाले आहेत. जे हजर झाले नाहीत त्यांचे विरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल व इतर ठिकाणावरुन १० कर्मचारी उपलब्ध करुन दिले जातील.

मा.श्री.कुमार वाकळे :- पैठणकरांनी सभागृहात खोटी माहिती दिली आहे.

उपायुक्त (सामान्य) :- सभागृहाला चुकीची माहिती सांगीतली असेल तर शहानिशा करुन संबंधिता विरुध्द कार्यवाही केली जाईल.

मा.श्री.कैलास गिरवले :- ५० टक्के कर्मचारी घरी बसून पगार घेतात. त्यांचे जागेवर दुसरे कर्मचारी नेमतात याची खोलात जावून दखल घ्या.

उपायुक्त (सामान्य) :- आयुक्त साहेबांशी चर्चा करुन या संदर्भात उचित कार्यवाही करण्यांत येईल. सोनवणे यांचे बाबतीत पुर्ण माहिती घेवून कार्यवाही करण्यांत येईल.

मा.श्री.दिप चव्हाण :- लाड पागे कमिटीच्या शिफारशी नुसार कर्मचा-याला किती मोजमापाचे काम सोपवावे, किती लोकसंख्ये मागे झाडू कामगार नेमावा. याचा डाटा ३५ वर्षा पासुन महानगरपालिकेत माहिती आहे. कोंडवाडा बंद असतांना तेथील कर्मचारी, सफाई कर्मचारी दाखवले जातात. ही वास्तविकता आहे. आरोग्य विभागाकडील जेन्टस बी.डी.सी.डी.कडे दाखवतात. गार्डनमध्ये सफाई कर्मचारी दाखवले जातात. खरी चर्चा मांडा. मा.आयुक्तांना सुस्थिती सांगा. प्रभाग अधिका-यांकडे १५ चार्जेस आहेत. ते काय काम करणार. आरीफ भाईंनी तीन झोनचे कार्यालय हलविणे संदर्भात मागणी केली होती. त्या रिपोर्टवर आयुक्तांचीही स्वाक्षरी झाली. पुढे काही कार्यवाही झाली नाही. प्रभाग अधिका-यांना कुठलिही सिक्युरिटी नाही. सफाई कर्मचारी कमी झालेले नाहीत. लाड बर्वे कमिटीनुसार आपण सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांचे जागी लगेच नेमणुक करण्यांत येते.

मा.महापौर साहेब :- आयुक्त साहेब यांनी यापुढे प्रत्येक विभागामध्ये कर्मचारी कर्तव्यात आहेत किंवा नाहीत याची शहानिशा करुन गांभीर्याने कार्यवाही करावी.

मा.श्री.संजय घुले :- अनेक शिपाई कर्मचा-यांना गणवेश दिले आहेत. पण ते गणवेश घालत नाहीत. त्यामुळे कर्मचारी कोण व नगरसेवक कोण हे ओळखू येत नाही.

मा.श्री.कुमार वाकळे :- मी स्वतः माझ्या खर्चाने माझ्या प्रभागात १० पाईप लाईन टाकल्या. फेज-२ चे काम कुठपर्यंत आले आहे ते सांगा.

श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :- फेज -२ चा इएसआर बोल्हेगांव येथील टाकीचे काम पुर्ण झाले असून तीन क्रॉस कनेक्शन झाले आहेत. डिस्ट्रीब्युशनचे ६० ते ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. काही ठिकाणी अडचणी आहेत नगररचना विभागाचा अभिप्राय मागविण्यांत आला आहे. राघवेंद्र स्वामी मंदिर रस्त्यावर २ मीटर लोक पुढे आले आहेत. गांधीनगर मध्ये रस्त्याचे मोजमाप मिळत नाही. मोजणी नकाशा अद्याप मिळालेला नाही.

श्री.काकडे , अभियंता :- कातोरे वस्ती जवळ ३० मिटर रस्ता दर्शविला परंतु तेथे ३० मिटर भरत नाही.

नगररचनाकार श्री.पाटील :- जागा पाहून प्रयत्न केला होता. पुन्हा पाहणी करुन कार्यवाही करण्यांत येईल.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- कधी करणार हे आत्ताच सभागृहात सांगा.

नगररचनाकार श्री.पाटील :- आपसात मतभेद असल्यामुळे काम करण्यास अडचणी येतात.

मा.श्री.कैलास गिरवले :- त्या ठिकाणी ले-आउट मंजूर झालेले आहेत. मा.शासनाच्या नियमाप्रमाणे ६० मिटर रस्ता मंजूर झालेला आहे. मा.शासनाकडे रस्ते हस्तांतरीत झाले आहेत. असे असतांना संबंधित जागा मालक रस्त्याचे जागेवर आपला हक्क कसा सांगू शकतात. दोन दिवसात समक्ष जागा पाहणी करुन शाहनिशा करावी.

मा.महापौर साहेब :- जर कोणी ऐकत नसतील तर पोलीस प्रोटेक्शन घेवून लाईन आउट करुन देण्यात यावे.

नगररचनाकार श्री.पाटील :- दोन दिवसात लाईन आउट करुन दिली जाईल.

मा.श्री.कुमार वाकळे :- इथापे साहेबांना जर काही अडचणी असतील तर त्यांनी सभागृहात सांगावे.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- दोन दिवसात कार्यवाही करण्यांत यावी.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- त्या ठिकाणचे लाईन आउट बाबत चर्चा झाली आहे. मोकळया जागा असतील तर प्रश्न नाही. येवू देत नसतील तर पोलीस प्रोटेक्शन घेवून संबंधित विभागाने कार्यवाही करावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- संबंधित कोणत्या विभागाने कार्यवाही करावी.

अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :- नगररचना विभाग, पाणीपुरवठा विभाग व अतिक्रमण विभाग या तिनही विभागामार्फत समन्वयाने कार्यवाही करण्यांत येईल.

मा.श्री.गणेश भोसले :- मा.आयुक्त साहेबांनी याबाबत मार्गदर्शन करावे. पुढच्या सभेपर्यत काम झाले नाही तर सर्व सदस्य सभागृहात आंदोलन करतील. एकतर ४५० कामगार कमी आहेत. ठेका पध्दतीने लोक नेमा इकडचे कमी करुन तिकडे नेमू नका. महानगरपालिका झाल्यानंतर उपनगरात कर्मचारीच दिलेले नाहीत. रिटायर्ड झालेल्या जागी कर्मचारी भरलेले नाहीत. वाटल्या ठेका पध्दतीने कर्मचारी नेमा. पुढचा विषय घेण्यात यावा.

मा.श्रीमती.नसीम शेख :- मा.आयुक्त साहेब यांनी सिंघम स्टाईल मध्ये काम करा. व कामे मार्गी लावा ही आमची आपेक्षा आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- महालक्ष्मी उद्यान ते सत्यम हॉटेल पर्यंतचा रस्ता या दरम्यानचा जुना पुल आधीच पाडला मेहेर कॉन्ट्रॅक्टरने काम घेतलेले आहे. नगरोत्थान योजनेतील हा रस्ता आहे.

श्री.पारखी अभियंता :- सर्व्हे करायला वेळ लागला फुलारींना त्यांची शेती किती आहे हे माहिती नाही. त्यामुळे अडचण येत होती.

मा.श्री.कुमार वाकळे :- या कामास मा.शासनाचा निधी असून ठेकेदाराला जर लाईन आउट करुन मिळत नसेल तर यात चुकी कोणाची.

श्री.पारखी अभियंता :- मागच्या आठ दिवसा पासुन मी स्वतः थांबून काम करुन घेतले. १५ दिवसात पुलाचे काम चालू होईल.

मा.श्री.विजय गव्हाळे :- दि.२०/०५/२०१६ रोजी सिना नदी पुलाचे कामाबाबत यादी दिली आहे. ए.सी.कोठारी यांचेकडे हे काम असुन शासकीय योजनेतील ४० ते ४५ कोटींची कामे त्यांनी घेतली असून ती प्रलंबित आहे. या कामाचे रोखीचे काम ते करणार व नंतरचे काम प्रलंबित राहील. त्यांचेकडे जी ४० ते ४५ कोटींची कामे आहेत त्यापैकी पूर्ण कीती व प्रलंबित किती याची अगोदर चौकशी करा मगच त्यांना पुलाचे काम द्यावे.

मा.महापौर साहेब - कामे घेतलेली असतील तर ती वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. याबाबत प्रशासनाने तपासावे.

प्र.शहरअभियंता श्री.सोनटक्के :- मेसर्स कोठारी यांनी रितसर प्रक्रियेव्दारे निविदा दाखल केली असून त्यांची निविदा मा.स्थायी समितीने मंजूर केली आहे. करारनामा करणे बाबत त्यांना पत्र दिले आहे. मा.शासनाचे निधीतून काम प्रस्तावित असल्याने मुदतीत काम पूर्ण करावे लागणार आहे. अन्यथा निधी परत जाण्याची शक्यता आहे. आतापर्यंत सामान्य प्रशासन विभागामार्फत दंडात्मक अथवा ब्लॅक लिस्टची कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली नाही.

मा.श्रीमती.नसीम शेख :- अतिक्रमण काढलेले आहे. ताबडतोब दुस-या ठेकेदाराला नेमून काम देण्यात येवून काम करुन घेण्यात यावे.

प्र.शहरअभियंता श्री.सोनटक्के :- मे.कोठारी यांचेकडील प्रलंबित कामाबाबत उपायुक्त यांचेकडे बैठक घेवून नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

मा.श्री.विजय गव्हाळे :- हे जर काम अर्धवट राहिले तर मी आंदोलन करीन. अर्धवट कामाला तुम्ही जबाबदार राहणार आहात.

मा.श्री.किशोर डागवाले :- काम करायला ते जर सक्षम नसतील तर त्यांना वर्क ऑर्डर देवू नका याबाबत अहवाल द्या.

मा.श्री.कैलास गिरवले :- हा ठेकेदार फक्त काम घेतो व वेठीस धरतो. नागरिकांना याचा त्रास होतो.

मा.श्री.गणेश भोसले :- आपण अगोदर माहिती घेवू.

मा.श्री.किशोर डागवाले :- माझ्या वॉर्डात १५ कामे घेतली. परंतु त्या कामाचे पैसेच अद्याप महानगरपालिकेमध्ये भरले नाहीत. पदाधिका-यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याला काम देवू नका.

मा.श्री.दिप चव्हाण :- दलित वस्ती करीताचा निधी इतरत्र वापरता येत नाही. शासनाचे तसे डायरेक्शन आहेत. डी.एस.आर. रेटने कामे घेतात व नंतर रेट वाढुन घेतात. यापुर्वी १२ व्या व १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून अनेक कामे मंजूर आहेत. पण जागेवर काम झालेले नाही. नाट्यगहाचे कामासाठी ५० लाख रूपये उचल घेतलेली आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ठेकेदाराची पुर्ण माहिती मागील कामे, प्रलंबित कामे या बाबत घेण्यात यावी व दोषी आढळले तर कारवाई करण्यात यावी.

प्र.शहरअभियंता श्री.सोनटक्के :- सदर कामाची अद्याप पावेतो वर्क ऑर्डर देण्यात आलेली नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- सर्व प्रोसीजर फॉलोअप केल्या असतील तर कोणत्या अधिकारात आपणास कामे थांबवता येतील. याकरीता पुर्ण माहिती घेवून कामे जर पुर्ण केली नसतील कारवाई प्रस्तावित करावी.

मा.सौ.घुले :- माझे प्रभाग क्रमांक २४ मधील ढोरगल्ली, फुलारगल्ली व इतर परिसरात पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रशासनास सांगुन दखल घेतली जात नाही. दोन दिवसात जर प्रश्न मार्गी लागला नाहीतर वार्डातील नागरिकांसह तिव्र आंदोलन करण्यात येईल.

मा.श्रीमती.मंगला गुंदेचा :- माझ्या प्रभागात सुध्दा घाण पाण्याचा प्रश्न आहे. जागोजागी रस्ते खोदुन ठेवले आहेत. वॉर्डात फिरायला लाज वाटते.

मा.श्री.गणेश भोसले :- एकतर कमी दाबाने पाणी, त्यातही दुषीत पाणी येते.

मा.श्री.दिप चव्हाण :- आमच्या सिध्दार्थनगर भागातही कमी पाणीपुरवठा होतो.

श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :- अपुरा व कमी दाबाने पाणी पुरवठा बाबत सामान्य सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. याबाबत खुलासा करतो गेल्या दोन महिन्यापासुन पाणी पुरवठा योजनेवरील वीज पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याने शहरास २४ तास पाणी पुरवठा होत नव्हता पुर्ण दाबाने पाणी पुरवठा होणेसाठी २४ तास पंपिंग कार्यरत पाहीजे. वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे पंपिंग पुर्व पदावर येण्यासाठी दोन तासाचा कालावधी जातो. सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. शनिवार नंतर सुरळीत पाणी पुरवठा केला आहे.

मा.श्री.संजय घुले :- आमच्या वॉर्डाचे वॉलमन पाणी व्यवस्थीत सोडत नाही. माळीवाडा हरीजन वस्ती भागात अर्धवट पाईपलाईन टाकुन ठेवली ती जोडली जात नाही. तेथे राहणारे कष्टकरी मजूर वर्ग आहे. त्यांना दरमहा १०० रुपये देवून पाणी घ्यावे लागते. लाईनला दोन पाईप जोडावयाचे राहिले आहेत ते जोडले जात नाहीत. का जोडले जात नाहीत. तेथील लोकांनी ३ ते ४ वेळा सहकार सभागृहाजवळ रस्ता रोको केला आहे.

श्री.निकम मेकॅनिकल इंजिनियर :- नविन रस्ता झालेला आहे. तो फोडावा लागेल. त्यामुळे पाईप टाकले नाही. त्यांना आपण पर्यायी व्यवस्था केलेली आहे. समक्ष पाहणी करुन घेतो व जोडुन देतो.

मा.श्री.कैलास गिरवले :- सारसनगर, चिपाडेमळा भागातील माहिती नगररचनाकार यांनी घ्यावी. या अगोदर चर्चा झाल्याप्रमाणे कातोरे वस्ती प्रमाणे हाही प्रश्न झाला आहे. रस्ता सरकारी मालकीचा झाला असतांना खाजगी हक्क दाखविला जातो. वरील ठिकाणी डी.पी.रोड आहे. प्रस्तावित ४० कोटी निधीतुन रस्ता मंजूर झालेला आहे. रस्ता हस्तांतरीत करुन न घेतल्यामुळे त्या जागेवर शॉपिंग सेंटर साठी बांधकाम परवानगी संबंधित जागा मालकाने मागीतली आहे. त्या संदर्भात परवानगी दिली का ? रस्ता आपल्या नावावर करुन घेतला का ?

श्री.बल्लाळ, नगररचना विभाग :- दोन दिवसात माहिती घेवून देवू.

मा.श्री.कैलास गिरवले :- बांधकाम परवानगी दिली नसेल तर देवू नका. दिली असेल तर ती रद्द करा.

---*---

**ठराव :-**

सभागृह नेता मा.श्री.कुमार वाकळे यांनी दिलेल्या पत्रानुसार दिनांक २९-३-२०१६ रोजी मा.महासभा विषय क्र. ६० मुद्दा क्र. १३ मधील महापौर शहर विकास निधी मधील सन २०१५-२०१६ मध्ये रक्कम रूपये ७ कोटी ५० लक्ष रकमेच्या कामाची कार्यवाही सुरू असून सदरची यादी प्रमाणे

| अ. नं. | कामाचा तपशील | कामाची रक्कम |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| १ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मार्केट यार्ड परिसरात आनंद पार्क या ठिकाणी रस्ता कॉक्रीटीकरण करणे | २,८८,७१३ |
| २ | प्र.क्र.२७ मधील टिळक रोड वरील सरस्वती मंगल कार्यालय ते जाधव घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ५,७१,३८६ |
| ३ | प्र.क्र.८ मध्ये निलगीरी पार्क अंतर्गत व यशश्री शाळा व संकेत ट्रेडर्स अंतर्गत ३०० व ४५० एम.एम.व्यासाची बंद पाईप गटर करणे | ६,००,००० |
| ४ | प्र.क्र.२९ मधील महात्मा फुले चौक ते सारसनगर भिंगार नाल्यापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ६,४३,११७ |
| ५ | प्र.क्र.११ मध्ये एल.आय.सी.कॉलनी मधील जोशी घर ते हरीओम ते अनुपमा व अंतर्गत तसेच लेख स्मृती ते रत्नप्रभा मोटर्स पर्यंत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ७,१७,९३६ |
| ६ | प्र.क्र २४ मधील पारगल्ली मधील गणपती मंदीर ते तालीम पर्यंतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ८,९३,३९८ |
| ७ | प्र.क्र.१२ मधील कांडेकर बंगल्याजवळील परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | १०,१८,२७४ |
| ८ | प्र.क्र.१२ मधील मनमाड हायवे ते भुतकरवाडी चौक व अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व अस्फाल्टीक कॉक्रीट करणे. | १०,२६,६९० |
| ९ | प्र.क्र.१२ मधील वरद इस्टेट येथील ओपन स्पेसला कंम्पौंड वॉल बांधणे व ओपन स्पेस विकसीत करणे | १०,२९,५८० |
| १० | प्र.क्र.१४ मधील सिध्दार्थ नगर कोथंबीरे गिरणी ते लवांडे घर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे तसेच गल्ली मध्ये व रस्ता क्रॉसींग पर्यंत कॉक्रीटीकरण करणे. | ११,४२,०७७ |

| | | |
|---|---|---|
| ११ | प्र.क्र.२५ समता कॉलनी येथील कासार घराजवळ ३०० एम.एम.व्यासाची बंद पाईप गटर करणे व रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ११,५४,६७३ |
| १२ | प्र.क्र.२८ मधील शिवनेरी चौक ते विरंगुळा मैदान सागर कॉम्प्लेक्स पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | १२,३९,२१० |
| १३ | प्र.क्र.३० मधील चाहुराणा स.नं.१२१/१ मध्ये गटरसह रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | १३,५४,२७० |
| १४ | प्र.क्र.३२ मधील मराठानगर, वैष्णवनगर अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | १३,६४,८८९ |
| १५ | प्र.क्र.२९ मधील भवानीनगर अंतर्गत रस्त्याचे रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | १३,७८,५१६ |
| १६ | प्र.क्र.३०मधील आनंदऋषी हॉस्पीटल ते नवा मराठा संपादक घर ते अरुण दुग्गड यांचे घरापर्यंत अंतर्गत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व कॉक्रीटीकरण करणे. | १४,२५,४४२ |
| १७ | प्र.क्र.१२ मधील महावीरनगर व अंतर्गत परिसरातील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | १४,६६,०११ |
| १८ | प्र.क्र.२६ मधील सथ्था कॉलनी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण, कॉक्रीटीकरण व डांबरीकरण करणे. | १५,२१,२४७ |
| १९ | प्र.क्र.१२ मध्ये समर्थ शाळा रस्ता डांबरीकरण करणे व प्रोफेसर कॉलनी चौका पर्यंत डांबरीकरण करणे. | १७,७१,८८८ |
| २० | प्र.क्र.२५ मधील नगर-कल्याण रोड जाधवनगर साईकृपा प्रेशर पंप ते म्हस्के ते झावरे घरापर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | १८,१६,७५० |
| २१ | प्र.क्र.१६ मधील सबलोक पेट्रोल पंप ते सर्जेपुरा हरीजन वस्ती पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २०,७३,४२७ |
| २२ | प्र.क्र.२९ मधील माध्यमिक शिक्षण मंडळ लक्ष्मीकॉर्नर ते समृध्दी अपार्टमेंट सारसनगर अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | २२,४९,०२९ |
| २३ | प्र.क्र.१२ मधील रासनेनगर चौक ते प्रेमदान हडको चौकापर्यंत रस्त्याचे मजबुंतीकरण व डांबरीकरण करणे | २२,९०,३४५ |
| २४ | प्र.क्र.२ मध्ये मुळ एस.टी.डी.ते गाडेकर गणपती व अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे व ऐश्वर्यानगरी अर्बन बँक कॉलनी व प्रभाग अंतर्गत पाईप गटर करणे. | २३,६१,७९४ |
| २५ | प्र.क्र.२९ मधील हातमपुरा हरबा तालीम ते जुने पोस्ट ऑफिस ते गोरख टेलर पर्यंत गटरसह रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे व बाबा बंगाली परिसरात रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २४,०५,१७४ |
| २६ | प्र.क्र.५ मध्ये स्वामी नगर अंतर्गत वृंदावन हॉटेल डी.पी. ते अथर्व बंगला व अंतर्गत, रुपमातानगर मध्ये अंतर्गत भागात रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे व प्रेमभारती नगर मध्ये जयभवानी चौक ते महात्मा किराणा स्टोअर्स पर्यंत पाईप गटर करणे. | २४,१०,३८० |
| २७ | प्र.क्र.२८ मधील झेंडीगेट मधील बुडन फौजदार मस्जिद ते जग्गी घर ते जब्बार कुरेशी घरापर्यंत गटरसह रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे व हनुमान मंदिर परिसरातील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | २४,२५,६९२ |

| | | |
|---|---|---|
| २८ | प्र.क्र.१० मुकुंदनगर मध्ये डायमंड ॲबॅकस क्लासेस ते निदा हाउस पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २४,२५,८४२ |
| २९ | प्र.क्र.३० मधील शाहुनगर अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | २४,७९,१७८ |
| ३० | प्र.क्र.३ मधील ज्ञानेश्वरनगर, बायजाबाई सोसायटी अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २४,८१,४८७ |
| ३१ | प्र.क्र.३३ मधील एकनाथनगर मधील नेप्ती रोड ते पठारे घर व शिवाजीनगर अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | २४,८५,२९० |
| ३२ | प्र.क्र.१२ मधील प्रोफेसर कॉलनी चौक ते तोफखाना पोलीस चौकी पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २४,९६,०६४ |
| ३३ | प्र.क्र.१२ मधील मनमाड हायवे ते फुलारी पेट्रोल पंप व अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | २४,९६,९९१ |
| ३४ | प्र.क्र.९ मधील मुकुंदनगर खुशी बालभवा ते अज्जु फर्निचर ते सोहेल घर ते तांबोळी किराणा ते अमरीन किराणा ते अबुतालीम घर ते मेहराज मस्जिद जवळ नासीर घर ते फिनाजभाई घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | २४,९७,२८५ |
| ३५ | प्र.क्र.१ मध्ये वडगांव गुप्ता रोड ते वक्ते कॉर्नर व परिसरातील रस्ते व पानमंद बंगला ते अतकारी बंगला ते वडगांव गुप्ता रोड पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | २४,९७,३८२ |
| ३६ | प्र.क्र.२७ मधील आगरकर मळा अंतर्गत खोकरनाला येथील डागवाले सर ते गायके मळयापर्यंत रस्ता मजबुतीकरण करणे व दिवाबत्तीची सोय करणे. | २४,९९,२२२ |
| ३७ | ई निविदा क्र.१२७२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील प्रोफेसर कॉलनी ते हॉटेल संतसेना पर्यतच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | ४९,९८,७३८ |

या संदर्भातील निविदा अंतिम कार्यवाही तसेच कार्यारंभ आदेश देणे व देयक अदायगी आदी बाबतची कार्यवाही सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात पूर्ण करावी लागणार आहे. या कामाची स्थिती स्पिल वर्क स्तरावरची असल्याने सदर कामाकरिता महापौर शहर विकास निधीचा खर्च सर्व मोबाईल कंपनीज, भारत संचार निगम, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी यांचेकडून रस्ता खोदाईपोटी वसुल होणा-या उत्पन्न रकमेतून सदर खर्च भागविणेत यावा तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजने करिता मा.शासनाकडून येणा-या तफावतीचे निधी पुर्नस्थापित करणेत यावा यामधून देखील सदरचा खर्च भागविणे कामी वापरणेत यावी. सदर निधीतील कामांचे देयके बाबत अर्थ विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी. यासह इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सभागृह नेता मा.श्री.कुमार वाकळे यांनी दिलेल्या पत्रानुसार मा.महासभा विषय क्र. ५८ दिनांक ११-३-२०१६ रोजी घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कामे सुचविणेत आलेली होती. सदरच्या कामाची अंदाजपत्रके ढोबळ मानाने तयार करणेत आलेली होती. तथापी महानगरपालिका प्रशासनाने तयार केलेली सुधारीत ११ कामांची सुधारीत रक्कमेची खर्चाच्या यादी खालील प्रमाणे

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजीत खर्च रूपये | सुधारीत खर्च रूपये |
|---|---|---|---|
| २ | बुरूडगांव सर्व्हे नं. ३४ संरक्षण भिंत बांधणे | ८१,००,०००/- | १,७०,०१,४८२/- |
| ४ | बुरूडगांव सर्व्हे नं. ३४ अंतर्गत रस्ते विकसीत करणे. | २४,००,०००/- | २२,१६,३७३/- |
| ५ | सावेडी सर्व्हे नं. २८९ या ठिकाणी संरक्षण भिंत बांधणे | ८९,००,०००/- | १,६७,४२,२०५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | सावेडी सर्व्हे नं. २८९ अंतर्गत रस्ते विकसीत करणे | २२,००,०००/- | २२,४९,७९७/- |
| १८ | वडगांव गुप्ता रोड ते पोखर्डी शिवार वरील सावेडी सर्व्हे नं. २८९ या कचरा डेपो पर्यत जाणारा रस्ता विकसीत करणे. | ७५,००,०००/- | ८६,९३,८७१/- |
| ६ | सावेडी मान्सून शेड | ९७,००,०००/- | ४१,०६,९२५/- |
| ३ | बुरूडगांव मान्सून शेड | ७४,००,०००/- | ४२,८५,४१०/- |
| १७ ब | सावेडी विंडो कंपोस्ट प्लॅंट | ४५,००,०००/- | ४७,८७,०३३/- |
| १७ अ | बुरूडगांव विंडो कंपोस्ट प्लॅंट | ४०,००,०००/- | ३८,३८,३५९/- |
| ११ | सावेडी लॅण्ड फिल साईट | १,८०,००,०००/- | १,८०,००,०००/- |
| १० | बुरूडगांव लॅण्ड फिल साईट | १,५०,००,०००/- | १,५०,००,०००/- |
| | एकूण रूपये | ८,७७,००,०००/- | ९,६९,२१,४५५/- |

वरिल यादीप्रमाणे इतिवृत्त कायम करताना दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

प्रस्ताव क्रमांक ६० दिनांक २९/०३/२०१६ मधील मुद्दा क्रमांक १४ मधील स्वतंत्र लेखाशिर्षामधुन कै.शंकरराव घुले यांचे क्रीडा क्षेत्रातील मोठे योगदान पाहता क्रीडा क्षेत्रात ऑलंपिक मान्यता प्राप्त खेळ व देशी खेळांमध्ये उल्लेखनिय कार्य करणा-या महानगरपालिका शहर हद्दीतील खेळाडूंचा कै.शंकरराव घुले यांच्या नावाने पुरस्कार देण्यास ही सभा मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम करतांना या दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांत यावे. याकामी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने नियमानुसार करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,

अनुमोदक :- मा.श्री.संपत विजय बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०२** **दिनांक : १४ / ०६ /२०१६.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** दुखवटयाचा प्रस्ताव

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | अहमदनगर शहराचे माजी नगराध्यक्ष व महाराष्ट्र हमाल मापाडी पंचायतीचे प्रदेश अध्यक्ष मा.शंकरराव घुले यांचे दिनांक ५-५-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप उमटविणा-या ज्येष्ठ अभिनेत्री सुलभाताई देशपांडे यांचे दिनांक ५-६-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार अंकुशराव टोपे यांचे दिनांक २-५-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | निरंकारी संप्रदायाचे प्रमुख श्री.बाबा हरदेवसिंह यांचे दि.१३-५-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | अहमदनगर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी समाजकल्याण मंत्री बाबुराव भारस्कर यांचे दिनांक २-५-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | माजी गृहमंत्री तथा माजी खासदार बाबुसाहेब थिटे यांचे दिनांक १९-३-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | प्रख्यात कथ्थक गुरू श्रीमती आशाताई जोगळेकर यांचे दिनांक १९-३-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | नगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण दुलम यांचे दि.२९-३-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | नगर शहरातील ज्येष्ठ क्रिकेट खेळाडू शरद गांधी यांचे दिनांक २१-३-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | मराठी साहित्य क्षेत्रातील प्रसिध्द साहित्यिक व ज्येष्ठ समिक्षक प्रा.रा.ग.जाधव यांचे दिनांक २७-५-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | अहमदनगर शहर सहकारी बँकेचे संस्थापक व ज्येष्ठ अर्थतज्ञ प्रा.मुकुंद घैसास यांचे दिनांक २८-५-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | नगर शहरातील अशोका हॉटेलचे संचालक पॉलसिंग धुप्पड यांचे दि. २८-३-२०१६ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

---*---

**ठराव :-**

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०३** **दिनांक : १४ /०६/२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.पाटीलबा रावजी खेमनर, इलेक्ट्रीक लिपीक यांनी सादर केलेले वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणेबाबत निर्णयाकरीता प्रस्ताव.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १.मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.एमएजी २००५/९/ प्र.क्र.१/आरोग्य ३ मंत्रालय मुंबई दि.१९ मार्च २००५.

२.मा.महासभा ठराव क्र.२ दिनांक ०३/११/२००७.

३.मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र २०११/ प्र.क्र. ३३३/ ११/राकावी २, मंत्रालय,मुंबई दि.१६ नोव्हेंबर २०११.

४. मा.महासभा ठराव क्र.९ दिनांक २६/५/२०१२.

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो कि, मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनीक, आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.एम एजी २००५/९/ प्र.क्रं.१, आरोग्य ३,मंत्रालय,मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी आकस्मिक शासकीय निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रूग्णालयातील अंतररूग्ण उपचाराच्या वैदयकिय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्याअनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांस मा.महासभा ठराव क्रमांक २ दि.३/११/२००७ अन्वये ठराव पारित करण्यांत आलेला आहे. त्यानुसार जा.क्र.आस्था.३५१ दि.२९/४/२००८अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतीपुर्ती योजना दि.१/४/२००८ पासुन लागू करण्यांत आलेली आहे.

तदनंतर मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र २०११/ प्र.क्र.३३३ /११/ राकवि २, मंत्रालय,मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये दिनांक १९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करून प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रू.४००००/- वरून रू.१०००००/- पर्यत वाढविण्यात आलेली असून सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत व रू.१०००००/- पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल)नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयानुसार महापालिकेमध्ये कायम कर्मचा-यांचे रू.१०००००/- पर्यतचे व १०००००/-पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाचे परतावा देयक मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभा,अहमदनगर महानगरपालिका यांचे समोर मान्यते करीता सादर करण्यात आला असता मा.महासभेने दिनांक २६/५/२०१२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पहाता रक्कम रू.एक लाखापर्यत कायम कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी तसेच रक्कम रूपये एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती देणे बाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैदयकिय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.तसेच असे देखील ठरविण्यात येते की, एक लाख रकमेच्या पुढील कर्मचा-याच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासुन

मा.आयुक्त, यांनी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी."

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कर्मचा-यांनी वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देयके संबंधीत विभाग प्रमुख यांचे मार्फत सादर केलेली आहेत. सदरची देयके मुख्य वैदयकिय अधिकारी कै.बा.दे. दवाखाना,यांनी सदरच्या देयकामधील आजाराची पडताळणी केलेली असुन संबंधीत आजार शासन विर्निदिष्ठ यादीत समाविष्ट आहेत असे कळविले आहे. परंतु सदरच्या कर्मचा-यांनी दाखल केलेली बिले हे शासनाने ठरवून दिलेल्या दवाखान्या व्यतिरीक्त आहे असे कळविले आहे.

वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना देयके अदा करणेसाठी सन२०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता रू.६०,००,०००/- (रुपये साठ लाख) इतकी तरतुद केलेली आहे. सदर योजने अंतर्गत तक्त्यातील कर्मचा-यांनी वैदयकिय खर्च परतावा देयक सादर केलेली असुन त्याची एकूण रक्कम रू.५,३३,४२९/- इतकी होत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नाव | हुददा | रूग्णाचे नांव व कर्मचा-याशी नाते | मा.शासन निर्णयातील आजार क्र | आजाराचे स्वरूप | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.खेमनार पाटिलबा रावजी | इले. लिपीक | सौ.शकुंतला पाटीलबा खेमनार, - पत्नि | ०१ | पल्मनरी इर्मजन्सी | ५,३३,४२९/- | ४,८०,०८६/- |
| | | | | | | **एकुण** | **४,८०,०८६/-** |

तरी मा.शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वरील तक्त्यातील कर्मचा-यांनी त्यांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती देयक व देय रक्कम रु.४,८०,०८६/- (चार लाख ऐंशी हजार शहाऐंशी  फक्त) इतकी असुन सदरचे देयक  एक लाखापेक्षा जास्त असल्याने व एउक लाखापेक्षा जास्त देयक अदा करणे बाबत मंजुरी देणेचे अधिकार मा.महासभेला असल्यामुळे मा.महासभेची मंजुरी घेवुन पुढील कार्यवाही करणेस रिपोर्ट मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

बजेट तरतुद :- ६०,००,०००/-
एकुण खर्च :- १९,२७,७६५/-
शिल्लक :- ४०,७२,२३५/-

यावर सहाय्यक आयुक्त श्री.साबळे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखाअधिकारी श्री.विसपुते यांचा अभिप्राय की, उक्त नमुद शासन निर्णयानुसार व मा.महासभेस मंजुरीस्तव सादर करणेस्तव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर सो यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब श्री.ढगे यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर श्री.अभिषेक कळमकर यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

चर्चा :-

ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.श्री.दिप चव्हाण :- महानगरपालिके मार्फत रक्कम न देता यापुर्वी इन्शुरन्स कंपनी मार्फत कार्यवाही बाबत चर्चा झाली आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. विषय मंजूर करावा.

मा.महापौर साहेब - ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मा.श्री.किशोर डागवाले :- अमोल बागुल यांनी मला एक निवेदन दिले आहे.ते मी सभागृहात मांडतो.या बाबत प्रस्ताव नगरसचिव कार्यालयाकडे गेला आहे. कल्याण रोड येथील साईराम सोसायटी अंतर्गत रस्त्यास विजेता पथ असे नाव देणे बाबत त्यांनी मागणी केली आहे. त्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.दिप चव्हाण :- १० वी व १२ वी परिक्षेत ९० टक्केच्या पुढे मार्क पडणा-या विद्यार्थ्यांना महानगरपालिके तर्फे पारीतोषीक देण्यात यावे.

मा.आ.श्री.संग्राम जगताप :- जैन सोशल फेडरेशन यांनी नुकताच प्रस्ताव दिला असुन आनंदऋषी हॉस्पीटलला महानगरपालिकेने दिलेल्या जागेची खरेदी त्यांना मिळणे बाबत मागणी केली आहे. जो काही रेडीरेकनर प्रमाणे दर असेल त्याप्रमाणे रक्कम महानगर पालिकेस मिळणार आहे. मा.महापौर साहेबांनी मंजूरी द्यावी. ठरेल ती रक्कम द्यायला ते तयार आहेत. जागा ऑलरेडी आपण दिलेली आहे. विषय सूचीवर विषय घेण्यास विलंब झाला.नगरसचिव कार्यालयाकडे प्रस्ताव आलेला आहे.मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- या प्रस्तावावर नगररचना विभागाने जो अभिप्राय दिला आहे तो वाचून दाखवा.

नगररचनाकार श्री.पाटील :- जैन सोशल फेडरेशनला ९९ वर्षाचे भाडे कराराने जागा दिलेली आहे. आत्ताच्या जागेची किंमत दोन कोटी सदुसष्ट लाख आहे. सह संचालक नगररचना यांचे मत जागा द्यावी असे आहे. प्रिमीयम त्यांनी भरावा ,महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर यांची निवड कमिटीवर निवड करावी, या दोन तीन गोष्टी करण्यासाठी ते तयार होत नव्हते. त्यामुळे विलंब होत आहे.

मा.श्री.कैलास गिरवले :- वेळोवेळी त्यांना महानगरपालिकेचे पदाधिकारी घेणे बाबत मागणी केली आहे. त्यांना इतक्या वर्षापासुन आम्ही सहकार्यच करीत आहोत. जागा देण्यास आमचा विरोध नाही. आम्ही नगरसेवक असतांना ही जागा आनंदऋषीजी हॉस्पीटलला ठराव करुन दिलेली आहे. आपल्या मागणी प्रमाणे जर ते कार्यवाही करत नसतील तर त्यांची मागणी कशी पूर्ण करायची. त्यांना खरेदी देता येते का ? आयत्या वेळेच्या विषयात विषय न घेता विषयपत्रिकेवर विषय घेणे महत्वाचे आहे.

नगररचनाकार श्री.पाटील :- महासभेने जर ठराव केला तर तो मा.शासनाकडे पाठविण्यांत येईल.

मा.श्री.कैलास गिरवले :- मा.आयुक्त, मा.महापौर यांना पदसिध्द सदस्य म्हणुन कमिटीवर घेण्यात यावे. महानगरपालिका कर्मचा-यांना बीलामध्ये ५० टक्के सबसीडी दिली पाहिजे.

मा.महापौर साहेब :- करारनामा करताना मा.आयुक्त व मा.महापौर यांना हॉस्पीटलच्या मंडळावर पदसिध्द सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात यावी व महानगरपालिका कर्मचा-यांना बीलामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- भविष्यात कायदेशीर अडचणी येवू नये. सध्याचे जागेचे बाजारभाव काय चालू आहेत. जर काही भविष्यात बालंट आले तर सदस्यांवर येईल. आर्थिक जबाबदारी सदस्यांची राहील. आर्थिक दृष्टया सभागृह जबाबदार राहणार नाही. रेडीरेकनर नुसार दर आकारावा असा आमचा अट्टाहास नाही. बाजार मुल्यानुसार दर आकारा. प्रशासनाने सर्व कायदेशिर सोपस्कार करुन कार्यवाही करावी. प्रशासन यास संपूर्ण जबाबदार राहील.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा.आमदार अरुण जगताप यांचे नगराध्यक्षांचे काळात हा विषय मांडण्यांत आला त्यावर असणारे आरक्षण उठविण्यांत आले. एवढा चांगला विषय अजेंडयावर घेण्याऐवजी आयत्या वेळेच्या विषयात घेउ नये. बीपीएमसी ॲक्ट मध्ये आयत्या वेळेचे विषय घेता येत नाहीत. आयत्या वेळेचे विषय अशी तरतुद नाही. याची नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी. तीन दिवसांचा अजेंडा काढा ठराव होवून जाईल.

मा.आ.श्री.संग्राम जगताप :- आपण या विषयावर सखोल चर्चा घडवून आणली आहे. कोणताही विषय घूसडत नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- अजेंडयावर विषय घ्या. शासनाकडे पाठवा. शासनाचे जे मत येईल त्यावर निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर साहेब :- आत्ता सभागृहात या विषयावर सखोल चर्चा झालेली आहे. पुन्हा हा विषय अजेंडयावर चर्चेसाठी घेणे अभिप्रेत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- संस्थेचे सामाजिक काम पाहता जागा देण्यास हरकत नाही.

मा.महापौर साहेब :- या संस्थेवर मा.आयुक्त व मा.महापौर यांना पदसिध्द सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात यावी व महानगरपालिका कर्मचा-यांना उपचारार्थ बीलामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी. जागा देण्याबाबत प्रशासनाने प्रस्ताव तयार केलेला आहे. चालू रेडीरेकनर प्रमाणे मूल्य निर्धारण करुन प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी.

मा.श्री.संजय घुले :- सन २०१३ पासुन लेखा परिक्षण नियमावली आली. महानगरपालिका लेखा परिक्षण नियम २०१५ ला दिनांक २४/०४/२०१२ च्या सभेत मंजूरी मिळालेली आहे. सन २०१६-२०१७ पासुन या नियमाची अंमलबजावणी करावी.

मा.महापौर साहेब :- नियम मंजूर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- पुर्वी नाट्यगृहास नांव देण्याचा ठराव झालेला आढळून येत नाही. संभाजी महाराजांचा त्या परिसरात पुतळा बसविणे बाबतचा ठराव झालेला आहे.

मा.श्री.कैलास गिरवले :- ठराव मंजूर झालेला नसेल तर ही सूचना मंजूर करा. ठराव मंजूर झाला असल्यास प्रशासनाने माहिती घेवून कार्यवाही करा.

मा.आमदार श्री.संग्राम जगताप :- प्रोफेसर कॉलनी येथे महानगरपालिके तर्फे नाट्यसंकुल उभारण्यात येत आहे त्यास कै.ज्येष्ठ रंगकर्मी व सिने अभिनेता सदाशिव अमरापुरकर यांचे नांव देणेस मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.कैलास गिरवले :- यापुर्वी संभाजी महाराज व्यापारी संकुल असा ठराव झालेला आहे. तरी याबाबत अगोदर खात्री करुन मगच मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.संजय घुले :- महाराष्ट्र शासनाने स्टॅफिंग पॅटर्न मंजूर केला आहे. त्याप्रमाणे एक निवड समिती गठीत करुन १२ वर्षे व २४ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती दिली जाते. चारठाणकर साहेबांचे त्याबद्दल अभिनंदन. चांगला विषय त्यांनी मार्गी लावला. परंतु यातुन अनेक कर्मचारी वंचित राहिले आहेत. एल.एस.जी.डी.परिक्षा पास नसल्याने त्यांना या पदोन्नती पासुन वंचित ठेवले आहे. स्टॅफिंग पॅटर्न मध्ये एल.एस.जी.डी. पात्रतेचा कोठेही उल्लेख नाही अशी आमची माहिती आहे. मा.शासनाने फेब्रुवारी २०१६ मध्ये राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आकृतीबंधानुसार एल.एस.जी.डी. ची पात्रता ठेवलेली नाही. तसेच सन २००५ मध्ये रेफरन्स नं.२/३/४/९३ च्या सुधारीत ॲवॉर्डला मा.न्यायालयाने मान्यता दिली आहे. त्यानुसार उर्वरीत एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या सर्व कर्मचा-यांना ही कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात यावा.

उपायुक्त श्री.चारठाणकर :- तत्कालीन महानगरपालिका ॲवॉर्ड प्रमाणे ही प्रमोशन दिली गेली आहे. शासनाने स्टॅफिंग पॅटर्न मध्ये एल.एस.जी.डी. ची पात्रता ठेवलेली नाही. पुर्वीच्या कर्मचा-यांची एल.एस.जी.डी. ची अट शिथील केल्याने आता उर्वरीत कर्मचा-यांना पदोन्नती देत आहोत. आता ॲवार्ड प्रमाणे चालता येणार नाही. नियमित किंवा १२, २४ ची पदोन्नती एल.एस.जी.डी. नसलेल्या सर्व कर्मचा-यांना देण्यात येईल.

मा.महापौर साहेब :- महानगरपालिका ॲवॉर्ड प्रमाणे प्रमोशन दिली गेली आहे. शासनाने स्टॅफिंग पॅटर्न मध्ये एल.एस.जी.डी. ची पात्रता ठेवलेली नाही. १२, २४ वर्षाची कर्मचा-यांना पदोन्नती देण्याचे

राहीलेल्या सर्व कर्मचा-यांची एल.एस.जी.डी. ची अट शिथील करण्या बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. व उर्वरीत सर्व कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती सन २०१६ मध्ये मंजूर झालेल्या आकृतीबंधच्या नियमानुसार देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी श्री पाटीलबा रावजी खेमनर इलेक्ट्रीक लिपीक यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास व सदरच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदरच्या प्रकरणात अंतिम कार्यवाही करतांना मा.आयुक्त यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

नगरसेवक मा.श्री.संपत बारस्कर यांनी सभागृहात दिलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत रूपये ७०.०९८१ कोटी इतक्या रकमेच्या १५ कामांचे मुळ अंदाजपत्रकामधील रकमेच्या सुधारीत रकमेस ही सभा मान्यता देत आहे. या कामांबाबत अर्थ विभागाने योग्य ती कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे. सदर कामे खालील प्रमाणे आहेत.

| अ. नं. | योजनेतील कामाचे नांव | योजनेची मुळ मंजूरी रक्कम (लाखात) | तांत्रिक मान्यता रक्कम | निविदेची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | यश पॅलेस ते कोठी रस्त्याचे रूंदीकरण, मजबुतीकरण व कॉक्रीटीकरणासह इतर सुधारणा करणे | २२२९३०७ | १५०२.३२ | १४३४१९७६३ |
| | यश पॅलेश ते कोठी रस्त्याचे विद्युतीकरण करणे | | २९.२९ | २९२९३२२ |
| २ | बालिकाश्रम रस्त्याचे रूंदीकरण,डांबरीकरण, कॉक्रीटीकरणासह गटर व फुटपाथ सह काम करणे | ९९२.५० | १७९२.७१ | १७११४१८९९ |
| | बालिकाश्रम रस्त्याचे विद्युत व्यवस्थेसह काम करणे. | | २८.६९ | २८३९७२६ |
| ३ | पाईप लाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे | १८०.१७ | ७६.६९ | ७६६९१४८ |
| | पाईप लाईन रस्त्याच्या मध्यभागी विद्युतीकरण करणे. | | ५०.३२ | ५०३२६३३ |
| ४ | मनमाड रोड सत्यम हॉटेल ते भुतकरवाडी पंपीग स्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण , मजबुतीकरण, डांबरीकरण पुलाच्या कामासह करणे | ४०१.२५ | ४७६.९१ | ४५५२८४३५ |
| | मनमाड रोड ते सत्यम हॉटेल ते भुतकरवाडी पंपीग स्टेशन पर्यत रस्त्याचे विद्युतीकरण करणे | | ३७.३७ | ३७३७६६३ |
| ५ | अ.नगर मनपा हद्दीतील विविध ठिकाणी पथदिवे संच बसविणे बाबत | ३३०.०० | ३३०.०० | ३३०००००० |
| ६ | नगर पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उडडान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिर पर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून कॉक्रीटीकरणासह डांबरीकरण करणे. | ११२४.४३ | १०७३.८ | १०२५१०९१३ |
| | नगर पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उडडान पुल ते केडगांव रेणुका देवी मंदिर पर्यत रस्त्याचे विद्युतीकरण करणे | | १९.४८ | १९४८१२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | प्र.क्र. ५१ व ५२ मध्ये ९ मीटर उंचीचे पोल, अंडरग्राउंड केबल व ४ x २४ वॅट एनर्जी सेव्हींग फिटींग बसविणे बाबत | ११८.०० | ११८.०० | ११८००००० |
| ८ | लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपूरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत रस्ता रूंदीकरणासह डांबरीकरण करणे | ५१३.७६ | ० | ० |
| | लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपूरा चौक ते फलटण पोलिस चौकी पर्यत विद्युतीकरण करणे. | | २४.५२ | २४५२८९८ |
| ९ | अमरधाम रोड वेताळ बाबा मंदिर ते एमएसईबी सब स्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण,मजबुतीकरण , डांबरीकरण करणे | ९४.९५ | ८१.७४ | ७८०३४७५ |
| | अमरधाम रोड वेताळ बाबा मंदिर ते एमएसईबी सब स्टेशन पर्यत रस्त्याचे विद्युतीकरण करणे | | ९.४८ | ९४८५२२ |
| १० | प्र.क्र. १६ झोपडी कॅन्टीन ते लक्ष्मी नगर , हिम्मतनगर येथे ९ मी उंचीचे पोल, अंडरग्राउंड केबल व ४ x २४वॅट एनर्जी सेव्हींग फिटींग बसविणे | १६.५० | १६.५ | १६४९९८७ |
| ११ | अ.नगर मनपा हद्दीतील शहराच्या प्रवेश द्वाराजवळ कायनेटीक चौक ते ट्राफिक ऑफिस डीएसपी चौक ते सनी हॉटेल पर्यत , पत्रकार चौक ते नागापूर पेट्रोल पंपा पर्यत तसेच नेप्ती चौक ते कल्याण रोड पुलापर्यत ९ मीटर उंचीचे पोल, अंडरग्राउंड केबल व ४ x २४ वॅट एनर्जी सेव्हींग फिटींग बसविणे | १५१.०० | १५१ | १५०९९९९१ |
| १२ | औरंगाबाद रस्त्यावरील वन विभागापासून शहा शरीफ दर्गापर्यत रूंदीकरणासह डांबरीकरण करणे. | ३५०.६९ | १९०.९६ | २७७६७०३२ |
| | औरंगाबाद रस्त्यावरील वन विभागापासून शहा शरीफ दर्गापर्यत विद्युतीकरण करणे | | १५.२७ | १५२७५७३ |
| १३ | औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोग नगर कोप-या पर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे | ३५०.६९ | १९०.९६ | २७७६७०३२ |
| | औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोग नगर कोप-या पर्यत रस्त्याचे विद्युतीकरण करणे. | | १५.२७ | १५२७५७३ |
| १४ | मुकुंदनगर गोविंदपूरा ते कॅन्टोमेंट नाल्यापर्यतच्या रस्त्याचे बाजूने पावसाचे पाणी जाण्यासाठी आरसीसी पाईप गटर करणे | १५४.७८ | २.०४ | २०४६४५६७ |
| १५ | प्रेमदान चौक, सक्कर चौक, चांदणी चौक, एस.टी.स्टॅण्ड चौक, मार्केट यार्ड चौक, अप्पू हत्ती चौक येथे ट्रॅफिक सिग्नल बसविणे | ३८.५० | ३८.५ | ३८५०००० |

या सभेमध्ये नगरसेवक मा.श्री.सुभाष लोंढे व नगरसेविका मा.सौ.रूपालीताई वारे यांनी दिलेल्या पत्रानुसार दादा चौधरी विद्यालया जवळील ८ x १० फुटाची मोकळी जागा श्री.संतोष शंकरराव गायकवाड यांना व्यवसायासाठी ११ वर्षे मुदतीने भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. सदर जागा भाडयाने देण्यकरीता आवश्यक ती कार्यालयीन पूर्तता, भाडे, डिपॉझिट, करारनामा आदी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने पार पाडण्याच्या दृष्टिने नियमानुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नगरसेवक मा.श्री.संपत बारस्कर यांनी दिलेल्या पत्रानुसार माळीवाडा वेशी जवळील राजेश ग्रेन भांडार भोपळे गल्ली शेजारील महानगरपालिकेची ८ x १० फुटाची मोकळी जागा सौ.स्वाती शाम साठे रा.माळीवाडा यांना व्यवसायासाठी ११ वर्षे मुदतीने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर जागेचे भाडे डिपॉझिट करारनामा आदी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने पार पाडण्याच्या दृष्टिने नियमानुसार कार्यवाही करावी. अर्जदार सौ.मनिषा सागर दुस्सल रा.प्रेमदान हडको,अहमदनगर यांना बांगडीवाला बिझनेस सेंटर समोरील बस स्टॉप शेजारी मनपाची ७ x ८ फुटाची मोकळी जागा अर्जदारास व्यवसायासाठी ११ वर्षे मुदतीने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर जागेचे भाडे डिपॉझिट करारनामा आदी बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने पार पाडण्याच्या दृष्टिने नियमानुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये (२०१२) चे कलम ४६५(२) नुसार महानगरपालिकेच्या महसुलातून खर्च करण्यास मान्यता न देण्याचे मुख्य लेखापरीक्षकाचे अधिकार, आक्षेपांची मिटवणूक करणेबाबतचे अधिकार याबाबत विनियम तयार करण्याचे अधिकार मा.स्थायी समितीला आहेत.

त्या अनुषंगाने मा.स्थायी समितीने दिनांक २५/०४/२०१६ च्या स्थायी समितीमध्ये महानगरपालिका अहमदनगर लेखा परीक्षण विनियम २०१५ तयार करुन तसा ठराव क्रमांक ५ पारीत केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६५ (३)(ब) नुसार, सदरचे विनियमाची अंमलबजावणी सन २०१६-२०१७ पासून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच नगरसेवक मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.संजय घुले यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार नगर-कल्याण रोड लगत असलेला सर्व्हे नंबर २३९ P साईराम सोसायटी अंतर्गत रस्त्यास " **विजेता पथ** "असे नामकरण करणेस तसेच नामकरण फलक बसविणेकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

मा.श्री.संपत विजय बारस्कर, नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रानुसार सर्व्हे नंबर ३०७/३ महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली खुली जागा संपदा विद्या प्रतिष्ठान, ज्ञानसंपदा (इंग्लिश मेडीयम) स्कुल, या संस्थेस ११ वर्षाच्या मुदतीने क्रीडांगण या वापरासाठी अटी व शर्तीवर नियमानुसार देणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

सभागृहात नगरसेवक मा.श्री.संपत बारस्कर यांनी दिलेल्या पत्रानुसार वडगांव गुप्ता रोड, सावेडी, अहमदनगर याठिकाणी असलेल्या अपंग संजीवनी सोसायटीचे मुक-बधीर विद्यालय व वसतीगृहात शिकणा-या विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रीडांगणाची सोय उपलब्ध व्हावी याकरीता सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीकोनातुन सदर संस्थेस महानगरपालिकेची स.नं.३०७/१+२/१+२/१अ/३०८/१+२/अ ही खुली जागा ११ वर्षाच्या मुदतीने क्रीडांगण या वापरासाठी अटी व शर्तीवर नियमानुसार देणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

जैन सोशल फेडरेशन संचलीत राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.हॉस्पीटल करीता जागा मिळणे बाबतचे पत्र व त्यावरील प्रस्ताव तसेच सद्भावनापुर्वक व मानवतेच्या दृष्टीकोनातुन सदरच्या हॉस्पीटलच्या सेवेचा उपयोग शहरातील गोर-गरीब व गरजु रुग्णासह जिल्ह्यातुन व राज्याच्या विविध भागातुन येणा-या रुग्णांना माफक दरात दिल्या जाणा-या सेवेचा विचार करता, शासकीय दराने नगररचना योजना क्र.३ अंतिम भुखंड १२४ पैकी ३०८४.४१ चौ.मी. क्षेत्राची जागा प्रस्तावानुसार मालकी हक्काने शासकीय दराने विकत देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तथापि या बाबतची कार्यवाही व प्रस्तावातील नमुद बाबी पूर्ण करणे याकरीता प्रशासनाने कायदेशीर व नियमानुसार सर्व बाबी तपासुन कार्यालयीन सोपस्कार पार पाडणेबाबत उचीत कार्यवाही करावी. तसेच अहमदनगर महानगरपालिका सेवेतील कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबातील व्यक्ती यांचे उपचारार्थ सदर हॉस्पीटल मध्ये होणा-या बीलामध्ये त्यांना पन्नास टक्के सवलत देणेबाबतची अट, करार करतांना नमुद करावी. यास्तव कायदेशीर दृष्टया तपासुन कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे. सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.शासनाकडे पाठविणेत यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

मा.शासनाने फेब्रुवारी २०१६ मध्ये राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आकृतीबंधानुसार एल.एस.जी.डी. ची पात्रता ठेवलेली नाही. तसेच सन २००५ मध्ये रेफरन्स नं.२/३/४/९३ च्या सुधारीत ॲवॉर्डला मा.न्यायालयाने मान्यता दिली आहे. त्यानुसार उर्वरीत एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या सर्व कर्मचा-यांना ही कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी.

सुचक :- श्री.संपत विजय बारस्कर

अनुमोदक :- सौ.रूपाली निखील वारे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०४** **दिनांक : १४ /०६/२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (सर्वासाठी घरे) राबविणे बाबत मा.शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्र.आयो-२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल) दिनांक ९ डिसेंबर २०१५ व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- मा. शासन गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय क्र.प्रआयो.२०१५ /प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल) दिनांक ९ डिसेंबर २०१५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, केंद्र शासनाने नागरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजना (सर्वासाठी घरे) जाहीर केली असून त्यामध्ये खालील चार घटक समाविष्ट आहेत.

१) जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडपट्ट्यांचा "आहे तेथेच " पुनर्विकास करणे.

२) कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा-या घरांची निर्मिती करणे.

३) खाजगी भागीदारीव्दारे परवडणा-या घरांची निर्मिती करणे

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांव्दारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान.

सदर बाबत वरील प्रमाणे चार घटकांकरीता संदर्भीय शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

**घटक क्रमांक १ -** केंद्र शासनाच्या"सर्वासाठी घरे २०२२ " या अभियानामधील या घटकासाठी निश्चित केलेली कार्यपध्दती व या शासन निर्णयात नमूद राज्य शासनाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार या संदर्भातील प्रस्ताव सादर करणे प्रत्येक प्रकल्पाची अंमलबजावणी यंत्रणेस बंधनकारक राहील."सर्वासाठी घरे कृती आराखडा" व "वार्षिक अंमलबजावणी आराखडा" नागरी स्वराज्य संस्था तयार करतील व नमूद केलेल्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील. सर्वेक्षणाअंती झ ोपडपट्ट्यांच्या विकासाकरीता तयार करण्यात येणारे प्रकल्प वर्धनक्षम होण्यासाठी सद्यः स्थितीत अस्तित्वात असणा-या प्रचलित विकास नियंत्रण नियमावली/तरतूदी/अधिनियमामध्ये बदल करणे आवश्यक असल्यास असे बदल करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमामधील तरतूदीनूसार कार्यवाही करुन मान्य करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नागरी स्वराज्य संस्थांची राहील. राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीस राज्य शासनाने मंजूर केलेला प्रति घरकुल राज्याच्या हिश्यांमध्ये प्रकल्पाच्या सुसाध्यतेसाठी २५ % पर्यंत बदल करण्याचे अधिकार राहतील.

**घटक क्रमांक २-** कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा-या घरांची निर्मिती करणे. ही योजना राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात राबविण्यात येईल.
सदर योजने करीता मा. केंद्र शासनाकडून प्रति सदनिका १.५ लक्ष व राज्य शासनाकडून १ लक्ष इतके अनुदान उपलब्ध होणार आहे. प्रति लाभार्थी ३० चौ.मी .बांधकाम अनुज्ञेय आहे.

सदर घटकांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना कर्ज संलग्न व्याज अनुदान योजना घरकुलाच्या निर्मितीकरीता व संपादनाकरीता असून यामध्ये कमी व्याज दरावर १५ वर्षकरीता विवक्षित बॅंका/गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था उपलब्ध करण्यात येईल. व्याजाच्या अनुदानाचा दर रुपये ६ लक्ष पर्यंत ६.५० % इतका राहणार असून १५ वर्षाचा कालावधी लक्षात घेऊन सदर व्याज अनुदानाची सध्याची किंमत (Net Present Value) संबंधित बॅंकांकडे केंद्र शासकीय यंत्रणांमार्फत थेट जमा करण्यात येणार आहे. सदर अनुदानासह असणा-या कर्जाची कमाल मर्यादा रु.६ लक्ष इतकी असून त्यापुढील कर्ज हे अनुदान विरहीत असेल.

सदर घटकाचे संनियंत्रण व आढावा हा केंद्र शासनाव्दारे घेण्यात येईल. ही योजना केंद्र शासनाच्या धोरणानुसार बॅकांमार्फत राबविण्यात येईल. राज्यस्तरावर समन्वयाचे काम "स्टेट लेव्हल बॅकर्स कमिटी " व जिल्हा स्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय बॅकर्स समिती त्या त्या जिल्ह्यातील घटक क्र.२ मधील योजनांची अंमलबजावणीचे संनियंत्रण करतील. राज्यस्तरीय बॅकर्स समिती व जिल्हास्तरीय बॅकर्स समितीच्या बैठकीत सदर योजनाचा अंमलबजावणीचा आढावा नियमितपणे घेण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत.

**घटक क्रमांक ३- भागीदारी तत्वावर परवडणा-या घरांची निर्मिती :-** सदर घटकांतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तीकरीता शासकीय यंत्रणा व खाजगी संस्थांशी भागीदारी करुन घरकुलांच्या निर्मितीचे उद्दीष्ट आहे. अशा प्रकल्पांकरीता केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष प्रति घरकुल इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या घटकाखाली ३० चौरस मीटर चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत. या घटकाखाली राज्य शासनामार्फत प्रति घरकुल रु.१ लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. या घटकांतर्गत सादर करण्यात येणा-या प्रकल्पामध्ये किमान २५० घरकुले असणे आवश्यक असून यातील किमान ३५ % घरे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असणे आवशयक आहे. या प्रकल्पासाठी खाजगी तसेच शासकीय / निमशासकीय संस्था स्वतंत्रपणे देखील सहभागी होऊ शकतील.

सदर योजनेखाली घरकुलांचे क्षेत्रफळ/ किंमत इ. बाबी निश्चित करण्याचे अधिकार राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीस राहतील.

या घटकाखाली प्राप्त प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती व केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती यांचे मान्यतेने राबविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**घटक क्रमांक ४- आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना व्यक्तिगत स्वरुपात घरकुल बांधण्यास अनुदान :-**

आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील पात्र कुटुंबांना त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या जागेवर नवीन घरकुल बांधण्यास अथवा राहत्या घराची वाढ करण्यास केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष पर्यंत अनुदान उपलब्ध करण्यात येईल. परंतु अशा लाभार्थ्यांचा समावेश सर्वासाठी घरे कृती आराखड्यात असणे आवश्यक आहे. या घटकाखाली राज्य शासनाचे अनुदान रु. १ लक्ष पर्यंत राहील. अनुदानाची रक्कम राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती मान्य करील. पात्र लाभार्थ्यांची आर्थिक क्षमता विचारात घेऊन शहर विकास आराखड्याशी अथावा सर्वासाठी घरे कृती आराखड्याशी सुसंगत असणारे प्रस्ताव एकत्र करुन राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील.

सर्वांसाठी घरे योजना राबविण्या संदर्भिय शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे बाबींचा समावेश आहे.

**अ) लाभार्थ्याच्या निवडीबाबत सर्वसाधारण अटी :-**

१) घटक क्र.१ साठी लाभार्थी म्हणून पात्रता महाराष्ट्र झोपडपट्टी (सु. नि.व पु.) अधिनियम,१९७१ मधील तरतूदीनुसार राहील.

२) गृहनिर्माण विभागाच्या दि.२४/०३/२०१४ च्या शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न ग़टातील व्यक्तीकरीता आर्थिक उत्पन्नाची मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. या केंद्र शासनाव्दारे या योजनेमध्ये विहित केलेल्या मर्यादापेक्षा कमी आहेत. राज्य शासनाव्दारे निश्चित केलेल्या मर्यादेशी केंद्र शासनाचा समतोल आणण्याची आवश्यकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने विहित केलेल्या आर्थिक मर्यादेपर्यत राज्य शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेत वाढ करण्यास मान्यता दिली आहे.

| गट | प्रतिवर्ष आर्थिक मर्यादा (रुपयामध्ये ) | | |
|---|---|---|---|
| | केंद्र | राज्य | राज्यासाठी सुधारीत आर्थिक मर्यादा |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थी | रु.३,००,०००/-पर्यंत | रु.१,८०,०००/- (अल्प उत्पन्न ग़ट पर्यंत) | रु.३,००,०००/- पर्यंत |
| अल्प उत्पन्न गटातील लाभार्थी | रु.३,००,००१ ते रु.६,००,०००/- पर्यंत | रु.१,८०,००१ ते रु.४,८०,०००/- पर्यंत | रु.३,००,००१/- ते रु. ६,००,०००/- पर्यंत |

घटक क्र.१ व्यतिरीक्त इतर घटकांसाठी पात्रता ही प्रधानमंत्री आवास योजना, "सर्वासाठी घरे " (नागरी) च्या मार्गदर्शक सूचनानूसार राहील.

**ब) राज्यस्तरीय मंजूरी व संनियंत्रण समिती-**

"सर्वासाठी घरे " या अभियानांअतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे काही फेरफारासह राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खाली नमूद राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती गठीत करण्यास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | सदस्याचे पदनाम | |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव, (नवि-१ )नगर विकास विभाग | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव, (नवि-२ )नगर विकास विभाग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य |
| ८ | प्रधान सचिव, महसूल व वन विभाग | सदस्य |
| ९ | संयोजक,स्टेट लेव्हल बॅकर्स कमिटी | सदस्य |
| १० | अभियान संचालक, सर्वासाठी घरे अभियान | सदस्य सचिव |

समिती आवश्यक वाटेल त्या इतर विशेष अधिकारी/ तज्ञांना निमंत्रित करु शकेल.

**क) समितीची कार्यकक्षा व अधिकार :-**

१) योजनेच्या मार्गदर्शक सूचनानूसार अभियानाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.
२) "सर्वासाठी घरे कृती आराखडा" मान्य करणे.
३) वार्षिक अंमलबजवणी आराखड्यास मंजूरी देणे.
४) विविध घटकांतर्गत सादर होणा-या तपशीलवार प्रकल्प प्रस्तावास मान्यता देणे.
५) वार्षिक गुणवत्ता संनियंत्रण आराखड्यास मान्यता देणे.
६) राज्याव्दारे शहरांकरीता मान्य करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा.
७) अभियानाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण
८) अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता उपस्थित अन्य बाबीबाबत निर्णय घेणे.

**क) शहरस्तरीय तांत्रिक कक्ष :-**

या अभियानाअंतर्गत संबंधित शहरांकरीता मार्गदर्शक सूचनानुसार तज्ञांची (चार पर्यंत) नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या नियुक्त्यांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मान्यता आवश्यक राहील. शहराच्या आकारमानानुसार शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील तज्ञांच्या कमाल संख्येत वाढ करण्याचे अधिकार केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीस असतील. याबाबतचे प्रस्ताव राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीमार्फत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीसमोर सादर करणे आवश्यक राहील. शहरस्तरीय तांत्रिक कक्षाचे प्रमुख हे नागरी स्वराज्य संस्थेचे प्रशासकीय प्रमुख यथास्थिती आयुक्त/मुख्य अधिकारी असतील व या कक्षाचे प्रमुख कार्य हे शहराचा सर्वासाठी घरे कृती आराखडा तयार करणे व वार्षिक अंमलबजावणी आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे, हे असेल. सदर कक्षातील तज्ञांच्या पदावर कंत्राटी पध्दतीने अथवा प्रतिनियुक्तीने अथवा उसनवारी तत्वावर नेमणूका करण्यात येतील. या कक्षाकरीता होणारा खर्च हा केंद्र शासन व राज्य शासनाच्या निधीतून ७५:२५ या प्रमाणात भागविण्यात यावा. या प्रयोजनाकरीता लागणारा राज्य हिश्याचा निधी विभागाच्या उपलब्ध नियतव्ययातून उपलब्ध करुन घेण्यात येईल.

**ड) प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा-**

| अ.क्र. | घटक | संस्था |
|---|---|---|
| १ | घटक क्र.१ | संबंधित झोपडपट्टीत पुनर्वसन प्राधिकरण व नागरी स्वराज्य संस्था. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या कार्यक्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहमतीने. |
| २ | घटक क्र.२ | या अभियानाच्या मार्गदर्शक सुचनानूसार. |
| ३ | घटक क्र.३ | नागरी स्वराज्य संस्था, सिडको, म्हाडा,शिवशाही पुनर्वसन प्रकल्प,पिंपरी चिंचवड नविन शहर विकास प्राधिकरण, नागपूर सुधार प्रण्यास व तत्सम शासकीय व निमशासकीय संस्था. |
| ४ | घटक क्र.४ | संबंधित नागरी स्वराज्य संस्था. |

**इ) प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती**

या अभियानांतर्गत योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्पाची अंमलबजावणी करणा-या यंत्रणांची राहील. अशा यंत्रणांनी सुकाणू अभिकरणामार्फत व अभियान संचालकामार्फत राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीला प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

नागरी स्वराज्य संस्थाव्दारे "सर्वासाठी घरे कृती आराखडा " व "वार्षिक अंमलबजावणी आराखडा" तयार करण्याकरीता काही कालावधी लागणार असल्याने जे प्रस्ताव सहजरित्या या आराखड्यांचा भाग होऊ शकतील असे प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा संबंधित सुकाणू अभिकरणांमार्फत अभियान संचालनालयास सादर करु शकतील. तथापि,याचा समावेश "सर्वासाठी घरे कृती आराखडा " व "वार्षिक अंमलबजावणी आराखडा " मध्ये समाविष्ट करणे याची दक्षता घेण्याची जबाबदारी नागरी स्वराज्य संस्थांची राहील.

सदर योजने अंतर्गत मा.केंद्र शासनाकडुन १.५ लक्ष प्रती घरकुल व राज्य शासन १ लक्ष प्रती घरकुल इतके अनुदान प्राप्त होणार आहे.

**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील घोषीत झोपडपट्ट्यांचा आढावा**

| अ.क्र. | झोपडपट्टीचे नांव | क्षेत्र हे. आर. | घोषीत वर्ष | जागेची मालकी |
|---|---|---|---|---|
| १ | माळीवाडा | ०.७९ | १९७६ | खाजगी |
| २ | बालिकाश्रम | १.२५ | १९७९ | खाजगी |
| ३ | सर्जेपुरा<br>हरिजन वस्ती | ०.१८ | १९७६ | खाजगी |
| ४ | सिध्दार्थनगर | ०.१२ | १९७६ | खाजगी |
| ५ | कोठी | १.१९ | १९७९ | खाजगी |
| ६ | मोचीवाडा<br>कचेरी | १.० | १९७९ | खाजगी |
| ७ | सावेडी गावठाण | १.८९ | १९७९ | खाजगी |
| ८ | मोचीवाडा तोफखाना | ०.१७ | १९७९ | खाजगी |
| ९ | ढोरवाडी | ०.४९ | १९७९ | खाजगी |
| १० | वैदुवाडी | ०.४२ | १९७९ | खाजगी |
| ११ | खोजा शरीफ हवेली | १.५१ | १९७९ | खाजगी |
| १२ | बुरुडगांव रोड | ०.७२ | १९७९ | खाजगी |
| १३ | भिमवाडी | | १९७९ | खाजगी |
| १४ | भारस्कर कॉलनी | | १९७९ | खाजगी |
| १५ | गवळी वाडा | १.२३ | १९८१ | खाजगी |
| १६ | दातरंगे मळा | ०.२७ | १९८१ | खाजगी |
| १७ | पद्मानगर | ३.८५ | १९८१ | खाजगी |

**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील अघोषीत झोपडपट्ट्यांचा आढावा**

| अ.क्र. | झोपडपट्टीचे नांव | क्षेत्र हे. आर. | घोषीत वर्ष | जागेची मालकी |
|---|---|---|---|---|
| १ | रामवाडी | -- | -- | कॅन्टोंमेंट |
| २ | मोरचुदनगर | -- | -- | म. न.पा. |
| ३ | गोकुळवाडी | -- | -- | कॅन्टोंमेंट |
| ४ | कौलारु | -- | -- | कॅन्टोंमेंट |
| ५ | सिध्दार्थनगर | -- | -- | -- |

तरी अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रधामंत्री आवास योजना राबविणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. महासभेकडेस सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर शहर अभियंता श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, अ.नगर मनपा हद्दीत मा.शासन निर्णयानुसार "प्रधानमंत्री आवास योजना" राबविणे बाबत धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, शहर अभियंता व प्रकल्प अभियंता यांचे प्रस्तावान्वये "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त (सा) श्री.अजय चारठाणकर यांचा अभिप्राय की, प्रस्तावित मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त श्री.दिलीप गावडे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर श्री.अभिषेक कळमकर यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

---*---

चर्चा :-

मा.श्रीमती.नसीम शेख :- त्यांचेकडील यादीचे वाचन केले. या प्रस्तावामधील घटक क्रमांक ४ नुसार अनुदानाची तरतुद आहे. माझे प्रभाग क्रमांक ९ व १५ मधील झोपडपट्टी मधील नागरिकांचा या योजनेत समावेश करा. म्हणजेच सर्वांना लाभ दिल्यासारखे होईल.

मा.महापौर साहेब :- मा.सभापती, मबाक यांनी दिलेल्या सुचनानुसार प्रशासनाने भविष्यात योग्य ती कार्यवाही करावी.

मा.श्री.विजय गव्हाळे :- संजयनगर घरकुल योजनेचे उद्‌घाटन केले. तेथे पिण्याच्या पाण्याची काय तरतुद केली आहे. वारूळाचा मारूती घरकुल योजना कधी पूर्ण होणार. काम अंतिम टप्प्यात आले आहे. एक महिन्यात पूर्ण होईल निधीची अडचण असल्याने काम प्रलंबित होते. पाणीपुरवठा विभागा मार्फत टाकी व नविन पाईपलाईन साठी निधी मंजूर असून काम मंजूर आहे. सर्वांसाठी घरकुल योजनेचा विषय मंजूर करण्यांत यावा.

श्री.सोनटक्के अभियंता :- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) सन २०१५-२०१६ निधी अंतर्गत मा.शासनाकडुन मान्यता मिळाली आहे. पाणी पुरवठा योजने मार्फत मंजूरी मिळालेली आहे. प्रकल्प प्राधिकरण प्रमाणपत्र मिळाल्यानंतर महिना भरात कार्यवाही केली जाईल. चार दिवसापुर्वी या संदर्भात काढण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव पुन्हा मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांचेकडे दाखल केला आहे.

मा.श्री.विजय गव्हाळे :- पंचशील नगर मधील बहुतांश लाभार्थी आहेत. त्यांना सध्या पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. तेथे नविन पाईपलाईन टाकुन देत नाही. टँकर व्दारे पाणी पुरवठा केला जातो.

श्री.सोनटक्के अभियंता :- पंचशील नगर मध्ये पाईपलाईन अस्तित्वात आहे. मध्यंतरी मुळाडॅम व विळद येथील खंडीत वीजपुरवठया मुळे संपुर्ण शहराला अपुराव व कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने संपुर्ण शहराला पाणी टंचाई जाणवली. या भागात गरज पडल्यास एखादे टँकर वाढवुन देण्यात येईल.

मा.आ.श्री.संग्राम जगताप :- भोसले ताईंनी जो विषय आत्ता मांडला. त्यामध्ये लालटाकी परिसराचा समावेश करण्यांत यावा. १५ नंबर वॉर्ड मधील भारस्कर कॉलनीचा समावेश करण्यात आला आहे. नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होतो.

मा.श्रीमती.नसीम शेख :- यांनी मा.महापौर यांना निवेदन केले.

मा.श्री.दिप चव्हाण :- विषय क्रमांक ४ खूप चांगला विषय आहे. १९ डिसेंबर २०१५ चा जी.आर.निकष सुध्दा दिले आहे. याठिकाणी मागे स्वच्छता अभियान ५४०० पैकी ४००० संडास अपूर्ण आहे. अनुदानाचा पहिला हप्ता दिला. परंतु अद्याप संडासाचे बांधकाम सुरु केलेले नाही. अशा परिस्थितीत निधीचा गैरवापर झाला तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शासन निर्णय आहे. त्याबाबत कार्यवाही केलेली नाही. या योजनेत एरिया जो दिलेला आहे, त्याचे चटई क्षेत्र किती आहे.

श्री.मेहेत्रे, प्रकल्प अभियंता :- ३३० स्क्वे.फुट एरिया दिलेला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- यापुर्वी शासनाच्या योजनेत २७० स्क्वे.फुट एरियाचा उल्लेख होता. बिल्डर कोण आहेत.

श्री.मेहेत्रे प्रकल्प अभियंता :- या योजनेत पहिला घटक झोपडपट्टया आहेत. दुसरा घटक जुन्या घराचे दुरूस्ती, वाढ करणे यासाठी ६ लाख रुपये ६.५० टकके दराने परत फेडीची रक्कम लाभार्थ्यांना मिळणार आहे. त्यासाठी स्वत:ची जागा आवश्यक आहे. तिसरा घटक बिल्डरने योजना राबवायची असुन लाभार्थ्यांकडील अडीच लाख रुपये अनुदान याकरीता लाभार्थ्यांना मिळणार आहे. बिल्डरने जर ६ ते ७ लाख रक्कम निश्चीत केली तर त्यात अडीच लाख लाभार्थ्यांना मिळणार आहेत. चौथा घटक खुल्या प्लॉट वर अडीच लाख रुपये घर बांधकामासाठी मिळणार आहेत. ही रक्कम परत फेड करावयाची नाही. घराची किंमत ठरवतांना डी.पी.आर. झाल्यानंतर त्यास मा.शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर किंमत ठरणार आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- लालटाकी, भारस्कर कॉलनी या परिसराचा योजनेत समावेश करण्यांत यावा. सिध्दार्थ नगर झोपडपट्टी १२ गुंठे दाखवली आहे. एवढे कमी क्षेत्र कसे दाखवले. त्यात दुरूस्ती करण्यांत यावी.

श्री.मेहेत्रे प्रकल्प अभियंता :- या योजने करीता एकुण सर्व्हे करणार आहे. त्यानंतर क्षेत्र ठरविले जाईल.

मा.श्री.दिप चव्हाण :- शेवटच्या स्थायी समितीमध्ये विषय ठेवत असतांना आयत्या वेळच्या विषयात हा विषय घेण्यात आला. चुकीच्या पध्दतीने कामे करु नका. महानगरपालिका कायद्यात आयत्या वेळेच्या विषयात विषय घेण्याची तरतुद नाही. घेतल्यास ते बेकायदेशिर होवू शकते. आम्ही फार टेक्नीकल नाही. आम्ही फक्त मंजूरी देतो. अशा पध्दतीने मंजूरी देत असाल. चुकीची कामे करत असाल तर त्याला आम्ही जबाबदार राहणार नाही. या योजनेचे माहिती पुस्तक नगरसेवकांना देण्यात यावे. एक-दोनदा या विषयावर चर्चा करा मगच त्याला मंजूरी देण्यात यावी. जळगांवच्या पध्दतीने झालेला प्रकार येथे होवू नये. आमच्यावर कोणताही ठपका ठेवू नये.

मा.श्री.संपत बारस्कर :- नगरसेवक निधी संदर्भात यापुर्वी विषय चर्चेला घेण्यात आला. गेल्या एक दोन वर्षापासुन या मागणीचे रुपांतर करतांना मा.उपायुक्त यांनी माहिती दिली. मा.आयुक्त, उपायुक्त यांचे अभिनंदन. पुढच्या सभेत मा.आयुक्त, उपायुक्त यांचा सत्कार करावा अशी मी विनंती करतो. सर्वांसाठी घरकुल योजनेचा विषय मंजूर करण्यांत यावा.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व मा.सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रधानमंत्री आवास योजना (सर्वासाठी घरे) ही योजना अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

ऑफीस रिपोर्ट मंजूर. नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.विजय नाना गव्हाळे,

अनुमोदक :- मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०५** **दिनांक : १४ /०६/२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका कायद्यातील तरतुदींनुसार प्रभाग क्रमांक ३२ चे नगरसेवक मा.श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे नगरसेवक पदा बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) मा.सौ.रुपालीताई निखील वारे, नगरसेविका यांचे दिनांक २५/०४/२०१६ रोजीचे पत्र.

२) मा.श्री.शेंडगे संजय छगनराव, विरोधीपक्ष नेता, यांचे पत्र जा.क्र.३ वर्कशीट दि.२५/०४/२०१६.

३) मा.श्री.शेंडगे संजय छगनराव, विरोधी पक्षनेता यांचे दिनांक १८/०५/२०१६ रोजीचे पत्र.

विनंतीपुर्वक रिपोर्ट करण्यांत येतो की, संदर्भीय क्र.१ अन्वये प्रभाग क्र.३२ चे नगरसेवक मा.श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे नगरसेवक पदा बाबत मा.सत्र न्यायालयाच्या निकालानंतर महानगरपालिका कायद्यातील तरतुदींनुसार मार्गदर्शन मागीतले आहे.

तसेच संदर्भीय क्रमांक २ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमधील श्री.संदीप भानुदास कोतकर, नगरसेवक यांना मा.न्यायालयाने दोषी ठरुन जन्मठेपेची शिक्षा दिल्याबाबत वर्तमान पत्रातील बातमीतून समजले आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने कोणता निर्णय घेतला याबाबत सविस्तर माहिती मिळावी. अशी मागणी केली आहे.

त्यावर नगरसचिव विभागाने दिनांक २८/०४/२०१६ रोजी सदर प्रकरणी न्यायालयीन कार्यवाहीचा भाग असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे याप्रकरणी महानगरपालिकेचे ॲड.श्री.प्रसन्ना जोशी यांचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करणे आवश्यक आहे. असा अहवाल सादर केला असता या खटल्याच्या निकालाची ऑर्डर घ्यावी व अन्य एक विधीज्ञ कडुन अभिप्राय घेणे योग्य असा आदेश देण्यात आला.

त्यानुसार १) मा.ॲड.श्री.प्रसन्ना जोशी व २) मा.ॲड.श्रीमती.अनिता दिघे यांचे अभिप्राय मागविले असता ते अनुक्रमे दिनांक १९/०५/२०१६ व २०/०५/२०१६ रोजी नगरसचिव विभागास प्राप्त झाले.

त्या अभिप्रायाचा सर्वसाधारण सारांश पुढील प्रमाणे आहे. -

संदर्भीय अर्जावर कार्यवाही करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०, ११, १२ व १३ चे विवेचन व अवलोकन होणे गरजेचे व आवश्यक आहे. आणि यासाठी कलम ४०५ मधील तरतुद लागू राहील.

नमुद कायद्याचे कलम १० व ११ हे सदस्य अपात्रतेबाबत असुन कलम १२ मधे या बाबत शंका व वाद उद्भवल्यास सदर प्रश्न संबंधित नगरसेवकास अथवा अन्य नगरसेवकास मा.न्यायाधिशाकडे पाठविता येऊ शकतो. तसेच महानगरपालिकेने विनंती केल्यास आयुक्तांनी प्रश्न मा.न्यायाधिशाकडे पाठविण्याची तरतुद आहे. मा.न्यायाधिशाकडे पाठविण्यात आल्यावर जो पर्यंत मा.न्यायाधिश या अधिनियमाव्दारे चौकशी करुन महापालिका सदस्याचे पद धारण करण्याचे बंद झाले आहे असा निर्णय देई पर्यंत असा महापालिका सदस्य अनर्ह झाला आहे असे मानले जाणार नाही. अशी तरतुद आहे. कलम १३ नुसार गैरवर्तणुकी बद्दल किंवा अशोभनीय गोष्टी बद्दल दोषी ठरलेल्या सदस्यास राज्य शासनाचे स्वतः हुन किंवा महापालिकेचे शिफारशीवरुन त्या व्यक्तीला सदस्य पदावरुन दूर करता येते.

दिनांक १९/०५/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या संदर्भीय क्रमांक ३ च्या अर्जावर मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी १) मा.ॲड.श्री.प्रसन्ना जोशी व २) मा.ॲड.श्रीमती.अनिता दिघे यांचे पुरवणी अभिप्राय संदर्भीय क्रमांक ३ चे संदर्भाने मागवावेत असे मौखिक आदेश दिले.

त्यानुसार नगरसचिव विभाग वशि. जा.क्र. ६० दिनांक २३/०५/२०१६ अन्वये मागणी केल्या नुसार ॲड.श्री.प्रसन्ना जोशी यांनी दिनांक २३/०५/२०१६ रोजी पुरवणी अभिप्राय दिला आहे. नमुद प्रकरणी निकालपत्र पाहता खटल्यातील आरोपी क्रमांक १० यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे व याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठात अपिल प्रलंबीत आहे. नमुद प्रकरण नगरसेवक पदाबाबत असल्याने या बाबत निकालपत्रात उल्लेख आहे किंवा नाही याची संपुर्ण पडताळणी केली असता निकालपत्रात कोठेही त्यांचे नगरसेवक पदा बाबत अपात्रता जाहिर झाल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुत प्रकरणात यापुर्वी देण्यात आलेल्या दिनांक १९/०५/२०१६ चे अभिप्रायात बदल होत नसुन तोच अभिप्राय कायम समजण्यात यावा. असे या पुरवणी अभिप्रायात म्हटले आहे.

ॲड.श्रीमती.अनिता दिघे यांना दिलेल्या नगरसचिव विभाग वशि. जा.क्र. ५९ दिनांक २३/०५/२०१६ रोजीच्या पुरवणी अभिप्राय देणे बाबतच्या पत्रावर त्यांनी श्री.संदीप भानुदास कोतकर नगरसेवक यांना नगरसेवक पदावर अपात्र केल्याचे निकालपत्रात दिसुन येत नाही. त्यामुळे त्यांनी यापुर्वी दिनांक २०/०५/२०१६ रोजी दिलेल्या अभिप्रायात बदल होत नसुन तोच अभिप्राय कायम आहे. असा पुरवणी अभिप्राय दिनांक २५/०५/२०१६ रोजी दिला आहे.

विधीतज्ञांकडुन प्राप्त अभिप्रायाचा विचार करता - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०, ११, १२ व १३ आणि कलम ४०५ यांचा विचार करणे आवश्यक आहे.

मा.श्री.संदीप भानुदास कोतकर यांना ॲडीशनल सेशन्स जज्ज, नाशिक यांचे कोर्टातील केस नंबर ६२/२०१४ यामध्ये जन्मठेपेची (इम्प्रीझनमेंट फॉर लाईफ ) अशी शिक्षा देण्यात आली आहे.

श्री.संदीप भानुदास कोतकर यांची दिनांक ३०/१२/२०१३ ते २९/०३/२०१६ अखेर उपस्थिती, रजा व गैरहजेरी ही पुढील प्रमाणे आहे. दिनांक ३०/१२/२०१३ च्या सभेस हजर, दिनांक १५/०२/२०१४ रोजीच्या सभेस प्रतिनिधी नियुक्त, दिनांक ०५/०७/२०१४ च्या दोन सभेस हजर, दिनांक ०६/०७/२०१४ च्या सभेस गैरहजर, दिनांक ०३/०९/२०१४ ते २०/०२/२०१५ पर्यंतच्या सभेस रजेवर, दिनांक २७/०५/२०१५ रोजीच्या सभेस गैरहजर, दिनांक ०८/०६/२०१५ रोजीच्या सभेस हजर, दिनांक ३१/०८/२०१५ ते २९/०३/२०१६ च्या सभांना रजेवर.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०, ११, १२, १३ व ४०५ यांचा विचार करुन प्रस्तुत प्रकरणी महासभेने योग्य निर्णय घेणे करीता महासभेपुढे सविनय सादर.

यावर उपायुक्त (सा) श्री.अजय चारठाणकर यांचा अभिप्राय की, प्राप्त अभिप्राय व विभागाची टिपणी नुसार प्रकरण महासभेपुढे सादर करणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर श्री.अभिषेक कळमकर यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

---*---

चर्चा :-

विषय क्रमांक ५ चे वाचन - ऑफिस रिपोर्टचे वाचन.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा विषय सभागृहाचा नाही. ज्या पध्दतीने हा विषय आणण्यात आला तो चुकीचा आहे. ही चूक दुरुस्त व्हायला पाहिजे.

**मा.आयुक्त साहेब :-** सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली ही त्या सदस्यांना उत्तर देवून संपवायला पाहिजे होता. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार नगरसचिव प्रस्ताव सादर करीत नाहीत. हा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार घेतला की, भारतीय दंड संहिते नुसार घेतला ? सभागृहात हा विषय आणायला नको होता. भारतीय दंड विधान १५३ अंतर्गत सभागृह चालत नाही. त्यांना जी शिक्षा झाली ती वैयक्तीक आहे. ही चूक दुरुस्त करा. ते आमचे सन्माननीय गटनेते आहेत. ॲड.प्रसन्ना जोशी यांनी काय मत दिले ते वाचून दाखविले. भारतीय दंड विधान ५०५ प्रमाणे सभेचे कामकाज चाललेले नाही. सभागृहात काहीच निर्णय याबाबत घेवू नका. मा.शासन काय निर्णय देईल ते देवू द्या. तात्कालीन आयुक्तांनी प्रस्तावावर फक्त ऑर्डर प्राप्त करुन घ्या असा अभिप्राय मांडलेला आहे. शासनाकडे पाठवा हे सुध्दा सांगणेचा अधिकार सभागृहाला नाही. कशाच्या आधारे हा विषय विषयपत्रिकेवर घेतला.

**नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :-** माझेकडेस सदरची पत्रे पुढील कार्यवाही साठी पाठविल्याने मी प्रस्ताव सादर केला. त्या प्रस्तावावर ऑर्डर प्राप्त करुन घेण्याचा व अभिप्राय घेणेचा आदेश दिल्यानुसार हा प्रस्ताव आला. मा.सभागृहाने याबाबत काय तो अंतिम निर्णय घ्यावा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडुन यायला पाहिजे होता. हा प्रस्ताव सभागृहात यायलाच नको होता. विरोधीपक्ष नेते श्री.शेंडगे यांनी नगरसचिव यांना विचारलेले नाही. विरोधी पक्ष नेते श्री.शेंडगे यांचे पहिले पत्र दिनांक २५-०४-२०१६ चे पत्र वाचन केले. या पत्रात आयुक्तांना विचारणा केली आहे. ते आमचे गटनेते आहेत. या विषयावर कुठला निर्णय घ्यायचा नाही. जर निर्णय घेतला तर कंटेम्ट होईल. हा विषय तहकूब करा.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** हा विषय खरोखर चुकीचा आहे. भविष्यात अशा चूका कोणाकडूनही घडू शकतात. हा न्यायालयीन प्रक्रियेचा भाग आहे.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** ॲड.जोशी यांना याबाबत मत व्यक्त करु द्या.

**ॲड.श्री.प्रसन्ना जोशी :-** या संदर्भात झालेला सर्व पत्र व्यवहार सांगतो सुरुवातीस मा.सौ.रुपाली निखिल वारे, यांनी दिनांक २५/०४/२०१६ रोजी दिलेल्या पत्राचे वाचन केले. या पत्रावर मा.आयुक्त यांनी नगरसचिव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले. दुसरे पत्र मा.श्री.शेंडगे संजय छगनराव, विरोधी पक्ष नेता यांचे दिनांक २५/०४/२०१६ रोजीचे व त्यानंतर तिसरे पत्र मा.श्री.शेंडगे संजय छगनराव, विरोधी पक्ष नेता यांचे दिनांक १८/०५/२०१६ रोजीच्या पत्राचे वाचन केले. भारतीय दंड संहिते नुसार श्री.संदीप भानुदास कोतकर यांना शिक्षा झालेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०,११,१२,१३ मधील गोष्टींचा उहापोह करणे क्रमप्राप्त ठरते. दिनांक १९/०५/२०१६ रोजीचा मार्गदर्शनचा प्रथम अहवाल होता. याशिवाय मा.विरोधी पक्ष नेते श्री.संजय शेंडगे यांचे दिनांक १८/०५/२०१६ चे पत्र आहे की, त्यानुसार श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केली आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, (दिनांक १८/०५/२०१६ चे पत्र वाचुन दाखविले) यामध्ये श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे पद रद्द करण्याची मागणी केल्यामुळे वकीलाचा अभिप्राय घेणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार हा अहवाल आहे. प्रथम अहवाल दिला असुन पुरवणी अहवाल मागवला. फक्त कलम १० तरतुद म्हणुन वाचू शकत नाही. सोबत कलम ११,१२,१३ व ४०५ चा देखिल उहापोह करावा लागेल. कायद्याच्या इतर तरतुदींसह वाचावे लागते. एखादी शिक्षा लागलेली असेल त्यावेळी काय करावे. याबाबत अधिनियमात तीन बाबी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. न्यायालयाकडे तो स्वतः नगरसेवक अथवा अन्य नगरसेवक अथवा महानगरपालिकेच्या विनंतीवरुन आयुक्त मार्गदर्शन मागवू शकतात. कायद्यात महानगरपालिकेचा अर्थ महासभा असा आहे. म्हणुन आज रोजी हा निर्णय महासभेसमोर सादर केला आहे. त्यानुसार आम्ही अभिप्राय दिलेला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मा.श्री.अभिषेक कळमकर यांचे निवडणुकीवेळी तीन नगरसेवक एका रात्रीत डिसक्वालीफाईड काय करतात एका ठिकाणी अशी कारवाई व दुस-या ठिकाणी दुसरा न्याय असे कसे. कायद्याच्या बाबी प्रशासन व कोर्ट विभाग यांनी परस्पर वाचून करायला पाहिजेत.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** आपण निर्णयात पडू नये. हा निर्णय कोर्ट घेणार आहे. हा अधिकार कोर्टाचा आहे. त्यामुळे हे प्रकरण कोर्टाकडे पाठविण्यांत यावे. जो काय निर्णय कोर्ट देईल तो निर्णय आपल्याला मान्य करावा लागेल. तुम्ही निर्णय कोर्टात पाठवा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कोर्टात पाठवा.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चेनुसार हे प्रकरण मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार मा.न्यायाधिशांकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चेनुसार मा.श्री.संदीप भानुदास कोतकर हे नगरसेवक पदाकरीता अपात्र झाले आहेत किंवा नाहीत याबाबत निर्णय प्राप्त करुन घेणेकरीता हे प्रकरण मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदींनुसार मा.न्यायाधिशांकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. सुनिलकुमार सर्जेराव कोतकर,

अनुमोदक :- मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

चर्चा

मा.महापौर साहेब :- कोरम अभावी १० मिनिटे सभा तहकूब करण्यांत येत आहे.

कोरम नाही परंतु तहकुब सभा आहे. गणपूर्ती नसली तरी कामकाज निकाली काढण्याची तरतुद आहे ती वाचन केली. मा.महापौर अधिनियमातील तरतुदी नुसार सभा चालू करावी.

मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे विषयाचे वाचन केले.

मा.महापौर साहेब :- इतिवृत्त मंजूर करण्यापूर्वी दोन महत्वाचे विषय आहेत ते वाचुन दाखविले.

स्पील ओव्हरला मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महासभा ५३, ५६ दिनांक ११/०३/२०१६ रोजीचे घनकचरा व्यवस्थापन -------------- जोडलेल्या यादीस मंजुरी देण्यात येत आहे.

यापुर्वीच प्रशासकीय मान्यता दिलेली होती.

दुखवटयाचे प्रस्ताव वाचन

नगरसचिव :- मा.महापौर साहेब यांचे संमतीने मा.आयुक्त साहेब यांचा सत्कार करावा अशी विनंती.

मा.श्री.दिप चव्हाण :- बजेटच्या मिटींगचे दिवशी मी एक पत्र दिले त्याचे उत्तर नगरसचिव यांनी दिलेले नाही. बजेट हा फुगवटादार आहे. आयुक्त साहेबांनी सुध्दा मान्य केले. गव्हर्नमेंट ऑडीटर आल्या होत्या त्यांनीही हे सांगीतले आहे.

नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- पत्राची नोंद घेण्यात आली आहे. बजेट तयार करण्याचे काम अकौंट विभागाचे आहे. उत्तर दिलेले नाही हे खरे आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- उत्तर देत नाही सभागृहाचे संकेत आहे. सदस्यांच्या पत्रांना उत्तर देणे बंधनकारक आहे. विकासभाराची तरतुद संपूर्ण निधी संपलेला आहे. आज बजेटला मंजूर करुन घेता मंजूरी मिहाल्यानंतर बजेट लागू करतो.

मा.महापौर साहेब :- बजेटच्या महासभेत उशीराने प्रोसेससाठी वेळ लागला उशीर ङ्ााल्यामुळे तरतुदीपूर्ण झाल्या ते महापौर किंवा सदस्यांच्या सांगण्यानुसार कामे खतविले जातात.

मा.श्री.दिप चव्हाण :- ---- नंतर बजेट खाली येते त्याच्या अगोदर निधी सर्व संपला आहे. असे इथून पुढे हे घेडु नये.

मा.महापौर साहेब :- एकदा बजेट मंजुरी झाल्यानंतर आयुक्तांचे मंजुरीनंतर बजेटची कार्यवाही केली जाते सन २०१७-२०१८ च्या वेळेस बदल करु.

नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- अंदाजपत्रकीय सभा झालेल्या इतिवृत्ताचे शेवटचे परिच्छेदात बजेटच्या मंजूरीची वाट न पहाता कार्यवाही करावी अशी नोंद आहे. -------

मा.श्री.किशोर डागवाले :- ----------- मिटींग घेवून धडाक्याने सुरुवात केली इतिवृत्त कायम करत असतांना वाकळे ाहेब बारस्कर यांनी ----------- तातडीने कामे मार्गी लागतील स्वतंत्र खाते केले तर त्यावर रक्कम वर्ग केली का.

मा.महापौर साहेब :- संबंधिताला खुलासा

मा.उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :- डागवाले साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यावर स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती. त्यामध्ये ------ १) नगरसेवक स्वेच्छा निधी महिला व बालकल्याण समिती १ स्वतंत्र निधी मागणे त्याप्रमाणे वेगळी खाते काढले आहे. आर्थिक नियोजन कसे करावयाचे तेही ठरले. -------- माध्यमातुन रक्कमा ----------------- साधारण --- नियोजन केले आहे. त्यास

विषय क्रमांक ५ चे वाचन - ऑफिस रिपोर्टचे वाचन.

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय सभागृहाचा नाही. ज्या पध्दतीने हा विषय आणण्यात आला तो चुकीचा आहे. ही चूक दुरुस्त व्हायला पाहिजे.

मा.आयुक्त साहेब :- सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही केली ही त्या सदस्यांना उत्तर देवून संपवायला पाहिजे होता. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार नगरसचिव प्रस्ताव सादर करीत नाहीत. हा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार घेतला की, भारतीय दंड संहिते नुसार घेतला ? सभागृहात हा विषय आणायला नको होता. भारतीय दंड विधान १५३ अंतर्गत सभागृह चालत नाही. त्यांना जी शिक्षा झाली ती वैयक्तीक आहे. ही चूक दुरुस्त करा. ते आमचे सन्माननीय गटनेते आहेत. ॲड.प्रसन्ना जोशी यांनी काय मत दिले ते वाचून दाखविले. भारतीय दंड विधान ५०५ प्रमाणे सभेचे कामकाज चाललेले नाही. सभागृहात काहीच निर्णय याबाबत घेवू नका. मा.शासन काय निर्णय देईल ते देवू द्या. तात्कालीन आयुक्तांनी प्रस्तावावर फक्त ऑर्डर प्राप्त करुन घ्या असा अभिप्राय मांडलेला आहे. शासनाकडे पाठवा हे सुध्दा सांगणेचा अधिकार सभागृहाला नाही. कशाच्या आधारे हा विषय विषयपत्रिकेवर घेतला.

नगरसचिव श्री.मिलींद वैद्य :- माझेकडेस सदरची पत्रे पुढील कार्यवाही साठी पाठविल्याने मी प्रस्ताव सादर केला. त्या प्रस्तावावर ऑर्डर प्राप्त करुन घेण्याचा व अभिप्राय घेणेचा आदेश दिल्यानुसार हा प्रस्ताव आला. मा.सभागृहाने याबाबत काय तो अंतिम निर्णय घ्यावा.

मा.श्री.दिप चव्हाण :- हा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडुन यायला पाहिजे होता. हा प्रस्ताव सभागृहात यायलाच नको होता. विरोधीपक्ष नेते श्री.शेंडगे यांनी नगरसचिव यांना विचारलेले नाही. विरोधी पक्ष नेते श्री.शेंडगे यांचे पहिले पत्र दिनांक २५-०४-२०१६ चे पत्र वाचन केले. या पत्रात आयुक्तांना विचारणा केली आहे. ते आमचे गटनेते आहेत. या विषयावर कुठला निर्णय घ्यायचा नाही. जर निर्णय घेतला तर कंटेम्ट होईल. हा विषय तहकूब करा.

